मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

शालेय परिभाषेचा प्रश्न ....

विचारतरंग ....

जसे त्यांनी राज्य केल ....

मेघमल्हार ....

मनाच्या अहंसंरक्षक योजना ....

जीवनलहरी ....

मधुनि मात्र ....

वैरीण ....

अनोळखी ....

तुझे डोळे ....

निवेदन ....

मनाचे संकल्प ....

देमांद माहात्म ....

भूकबळी ....

हासलीस एकदा | ....

श्री चैतन्यप्रभूंची महाराष्ट्रांतील तीथर्यात्रा ....

भैया तो चले गये ! ....

संघवार्ता ....

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संपादक मंडळ :

प्रा. भ. श्री. पंडित
डॉ. मा. गो. देशमुख
प्रा. अ. ना. देशपांडे
श्री. मधुकर मंगरूळकर

संपादक :

वामन चोरघडे

स्वातंत्र्याचें येतें सहावें वर्ष भाग्यविधात्याच्या
कृपेने महामानवसागरतीरींच्या साधकांना
सुखाचें, हिताचें, उत्कर्षाचें जावो.

पत्रव्यवहाराचा पत्ता :
"युगवाणी" कार्यालय
विदर्भ साहित्य संघ
उत्तर अंबाझरी रोड
धंतोली, नागपूर १०

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

शालेय परिभाषेचा प्रश्न

परिभाषा समिति, वि. सा. संघ

❊

नागपूर विद्यापीठाने कांही वर्षांपूर्वी पदवी परीक्षेपर्यंतचें सर्व विद्याशाखांचें शिक्षण विद्यार्थ्यांच्या मातृभाषांमधून (हिंदी व मराठी) देण्याचा ठराव केल्यापासून या राज्याच्या शिक्षणक्षेत्रांत बरीच अस्वस्थता व गुंतागुंत निर्माण झाली आहे.

मातृभाषांतून शिक्षण देण्याचा निर्णय वस्तुतः मुळीच वावगा नाही. प्रत्येक व्यक्तीला प्रारंभापासून अखेरपर्यंतचें शिक्षण तिच्या मातृभाषेंतून मिळाल्यानेच तें तिच्या ठायीं ठसेलें व मुरेल आणि संपादितें ज्ञानाचा जीवनांत उपयोग करून जीवन समृद्ध करण्याची तिला प्रेरणा देऊं शकेल हें निर्विवाद. पण शुभ कार्याला देखील मुहूर्त पाहावाच लागतो. किंबहुना शुभ कार्य फसूं नये अगर अनिष्ट परिणामी होऊं नये म्हणून तर काळवेळ जास्तच कसोशीने पाहावी लागते. मातृभाषा-मधून अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांची नीट सोय होऊं शकेल की नाही, देशांतील इतर विद्यापीठें या सुधारणेच्या बाबतींत आपल्याबरोबर पावलें टाकावयास तयार आहेत की नाहीत, अखिल भारतीय परीक्षांच्या स्पर्धांमध्ये या देशीभाषाशिक्षित तरुणांचा टिकाव लागेल की नाही, वरिष्ठ सरकारचें व इन्टर-युनिवर्सिटी बोर्डा-सारख्या अखिल भारतीय संघटनांचें या माध्यमाच्या प्रश्नाबाबत काय धोरण राहील, इत्यादि प्रश्नांचा धिम्मेपणाने विचार व्हावयास पाहिजे; आणि विद्यार्थ्यांचें नुकसान होणार नाही व ज्ञानार्जनाची पातळी घसरणार नाही, अशा बेताने मातृभाषा माध्यमाचा स्वीकार करावयास पाहिजे, असें पुष्कळ विचारी लोकांस आज वाटूं लागलेलें आहे.

वर नमूद केलेल्या अनेक प्रश्नांप्रमाणे पाठ्यपुस्तकांचाहि एक बिकट प्रश्न विद्यापीठासमोर होता. आणि या प्रश्नाच्या अनुषंगाने परिभाषेचा प्रश्न देखील दत्त म्हणून पुढे उभा राहणारा होता. वरच्या परिच्छेदांत उल्लेखिलेल्या व्यापक स्वरूपाच्या प्रश्नांची सोडवणूक विद्यापीठाकडून व सरकारकडून कशी होणार असेल ती असो; विदर्भ साहित्य संघाच्या कार्याशी त्यांचा खास व निकट संबंध येत नाही. पण पाठ्यपुस्तकें व त्यांतील परिभाषा यांचा अंतर्भाव संघाच्या कार्यक्षेत्रांत पूर्णपणे होतो. कारण पाठ्य पुस्तकें वाङ्मयांत मोडतात व परिभाषा हें भाषेचें महत्वाचें अंग आहे. म्हणूनच अकोला येथील विदर्भ साहित्य संमेलनांत परिभाषेसंबंधी महत्वाचा ठराव संघाने मंजूर केला असून त्या ठरावानुसार परिभाषा समिति निर्माण केली आहे.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

परिभाषा निर्मितीचा एक अचाट प्रयत्न डॉ. रघुवीर नामक महापंडितांनी नागपुरांत सरकारी आश्रयाने चालविलेला आहे हें मशहूर आहे. डॉ. रघुवीरांच्या सर्वसाधारण संपादकत्वाखाली इंटरमीजिएट परिक्षेसाठी नेमलेल्या सर्व शास्त्रीय विषयांचीं मराठी व हिंदी पाठ्यपुस्तकें गेल्या ५।६ वर्षांत तयार झालीं असून तीं नागपूर विद्यापीठाने अनुक्रमें मराठी व हिंदी माध्यमाकरितां चालू केलीं आहेत. प्रत्यक्ष वर्गामध्ये शिकवितांना या पाठ्यपुस्तकांचा कितपत उपयोग करण्यांत येतो या विषयीं चौकशी केली असतां पुष्कळसे प्राध्यापक इंग्रजीमध्येच व्याख्यानें व विषयाची समजूत देतात असें कळतें. शिवाय जे खरोखरी मराठी अगर हिंदींतून शिकवितात त्यांनी संज्ञा पूर्वीपासून चालू असलेल्या इंग्रजीच वापराव्या, अशी अनुज्ञा देणारें परिपत्रक शास्त्रीय महाविद्यालयामध्ये निघालें आहे असें ऐकिवांत आहे. विद्यार्थ्यांनी प्रयोगांचें लेखन इंग्रजींत केलें तरी चालेल अशीहि परवानगी देण्यांत आल्याचें कळतें. तरी देखील पुस्तकें नेमलेलीं आहेत डॉ. रघुवीरांनी संपादिलेलींच ! परीक्षा होणार ती या पुस्तकांवरून, यांतील परिभाषेचा उपयोग करून !

म्हणजे, विद्यार्थ्यांचें मॅट्रिक पर्यंतचें शिक्षण झालें परंपरागत चालत आलेल्या सर्वमान्य परिभाषेनुसार, पुढे कॉलेजांत प्राध्यापक शिकवतात बहुतांशीं इंग्रजींतून इंग्रजी परिभाषेच्या आधाराने, आणि नंतर परीक्षा व्हावयाची ती रघुवीरसंपादित पुस्तकांस अनुसरून ! कसें खासें शिक्षण होत असेल आमच्या तरुण पिढीचें !

विद्यापीठाच्या शास्त्रीय पुस्तकांवर सर्वसाधारण संपादक म्हणून रघुवीरांचें नांव छापलेलें आहे. हे संस्कृताचे प्राध्यापक पदार्थविज्ञान, रसायन, गणित इ० विषयांवरील उच्चशिक्षणाच्या पाठ्यपुस्तकांचे संपादक कसे होऊं शकले ? त्यांतली वस्तुस्थिति एवढीच दिसते कीं या पुस्तकांत वापरलेली परिभाषा उर्फ संज्ञासमूह हा रघुवीरांनी बनविलेला आहे. संज्ञा द्याव्या रघुवीरांनी आणि विषयाची मांडणी, वाक्यांची रचना वगैरे करावी त्या त्या विषयाच्या सरकारने नियुक्त केलेल्या प्राध्यापकांनी, असा श्रमविभाग झालेला होता, असें कळतें. संज्ञा सुचविल्या म्हणून डॉ. रघुवीर प्रधानसंपादक बनले.

पांच सहा वर्षांच्या खटाटोपानंतर—या खटाटोपापायीं सरकारचा, म्हणजे गरीब प्रजेचा किती पैसा खर्ची पडला कोण जाणे !,—यंदा हीं पाठ्यपुस्तकें बाहेर पडलीं. त्यांत वापरलेल्या परिभाषेची कसोटी विद्यापीठाच्या शिक्षणांत देखील अद्याप लाग-लेली नाही. असें असतां आता मात्र घाई करून मॅट्रिकपूर्वीच्या शिक्षणक्रमांत ही परि-भाषा सुरू करण्यांत यावी, यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत. वृत्तपत्रांतील कांही लेखांतून अशा तऱ्हेचे उल्लेख आले होते. संघाच्या परिभाषासमितीकडे कित्येक शिक्षकांचें याबाबत पत्र आलें होतें. हायस्कूल बोर्डाच्या येत्या सभेंत रघुवीरांच्या परिभाषेबाबतचा ठराव येणार असल्याची बोर्डाच्या कचेरींत वंदता आहे. या वंदतेला पोषक अशी आणखी एक बातमी ही की नागपूर विद्यापीठाच्या ॲकॅडेमिक कौन्सिलने रघुवीरची परिभाषा मॅट्रिकपर्यंतच्या अभ्यासक्रमांतहि स्वीकारण्यांत यावी असा शिफारसवजा ठराव केला आहे !

व्यक्तिसंबंध बाजूला ठेवून शांतपणे व निर्विकार दृष्टीने या प्रश्नाचा जर विचार केला, तर डॉ. रघुवीरांची परिभाषा माध्यमिक शिक्षणाच्या क्षेत्रांत घुसवूं पाहणें हा भयानक अतिप्रसंग होईल, असें म्हणणें भाग पडतें. खुद्द परिभाषेच्या गुणावगुणांकडे न वळतां देखील, वस्तुस्थितीची थोडीशी जाणीव करून घेतली म्हणजे वरील उद्गार पूर्णपणे सार्थ कसे आहेत, हें दिसून येईल.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एका मुद्याचा वर उल्लेख केलाच आहे. विद्यापीठाचीं पुस्तकें आता कोठे प्रसिद्ध होऊन तद्द्वारा रघुवीरकृत परिभाषा नुकतीच रंगणावर येत आहे. प्राध्यापक, विद्यार्थी, परीक्षक, लेखक या सर्वांच्या वापराची कसोटी अद्याप तिला लागायची आहे. कोणचे शब्द रुळतात, कायम होतात, कोणचे बदलावे लागतात, हें सर्व अद्यून दिसावयाचें आहे. या परिभाषेंत मोठमोठे प्रमाद असल्याबद्दल कित्येक शास्त्रज्ञांनी आक्षेप घेतले आहेत. अशा परिस्थितींत माध्यमिक शिक्षणासारख्या फार मोठ्या क्षेत्रांत ती लादूं पाहणें अन्यायाचें होणार आहे.

बरें, आमच्या भाषेंत (मराठींत व हिंदींतहि) पूर्वींचे कांही शब्दच नसते, हायस्कूलांत भूमिति शिकवतांना आम्ही भूमितीला जॉमेट्री, सरळ रेषेला स्ट्रेट लाइन, बिंदूला पॉइंट, त्रिकोणाला ट्रायांगल असेंच आजवर म्हणत आलों असतों, तर हा अन्याय देखील सहन करा, असें एखाद वेळ म्हटलें असतें. पण मॅट्रिकपर्यंतची सर्व शास्त्रीय विषयांची परिभाषा आमच्या मराठींत (व हिंदींतहि) इतकी छान तयार झालेली व कित्येक वर्षांच्या वापराने इतकी घोटीव बनलेली आहे की ती काढून टाकून दुसरी परिभाषा वापरा असें म्हणणें म्हणजे सुंदर बहराला आलेली जाईची वेल उपटून टाकून तेथे झेंडूचें किंवा तेरड्याचें रोपटें लावा असें म्हणण्यासारखेंच आहे.

हा मुद्दा फार महत्त्वाचा आहे. मराठींतल्या शास्त्रीय परिभाषेची परंपरा किमानपक्ष शंभर वर्षांची आहे. आपल्या या प्रांतांत गेलीं २५ वर्षे मातृभाषा माध्यम हायस्कूलांत चालू असल्यामुळे येथे ती परिभाषा दृढमूल व सुप्रतिष्ठित झालेली आहे. अनेक कुशल शिक्षक, शास्त्रज्ञ व लेखक यांची बुद्धिमत्ता व कल्पकता खर्ची पडून ही परिभाषा विकसित झालेली आहे व आमच्या भाषेचा ती अविभाज्य घटक बनलेली आहे. ती काढून टाकणें म्हणजे भाषेचा लचका तोडल्याप्रमाणे होणार आहे. ही परिभाषा वापरून लिहिलेलीं सर्व पुस्तकें रद्द होणार, भाषाप्रयोग बदलणार आणि शिक्षक (आपला मेंदू झिजवून जर रघुवीरकृत परिभाषा ते आत्मसात करणार नसतील तर) निकामी होणार! हें सर्व कशाकरितां?

खरें म्हटलें असतां परिभाषेची वाढ इतर सर्व गोष्टींप्रमाणे, खालून वर व्हावयास पाहिजे. आणि आजपर्यंत ती तशीच होत आलेली आहे. प्राथमिक शाळेमध्ये बेरीज, वजाबाकी, त्रैराशिक पंचराशिक, गुणोत्तर, प्रमाण इत्यादि संज्ञांचा परिचय होतो; त्या संज्ञा माध्यमिक शिक्षणामध्ये टाकून देण्यांत येत नाहीत तर त्या कायम ठेवून विषयाच्या पुढच्या अध्ययनाकरितां लागणाऱ्या नफा, तोटा, कटमिती, घात, वर्ग, घन, समीकरण, बीज इत्यादि अधिक संज्ञा तो शिकतो. हीच प्रक्रिया पुढे चालवून मॅट्रिक पर्यंतच्या माध्यमिक शिक्षणामध्ये जी परिभाषा विद्यार्थ्याने आत्मसात् केलेली असेल ती सर्व विद्यापीठीय शिक्षणांत जशीच्या तशी कायम राखून पुढच्या अध्ययनाकरितां जरूर असणारी जास्तीची परिभाषा तेवढी विद्यार्थ्याला नवीन शिकायला लावणें हें स्वाभाविक होय. ज्ञाताच्या आधारावरून अज्ञाताचें साधन करणें, हें सर्वमान्य असें शैक्षणिक तत्त्व आहे. या तत्त्वाची पायमल्ली करून, विद्यापीठीय अभ्यासक्रमाकरितां जी एक नवी परिभाषा घडविण्यांत आली ती खालच्या शिक्षणक्रमांत स्वीकारण्यांत यावी असा उरफाटा आग्रह करण्यांत येत आहे. हें 'आधी कळस मग पाया रे' असें होत आहे. खालपासून वरपर्यंत परिभाषेची एकरूपता असावयास पाहिजे हें खरें, पण त्याचा अर्थ असा नव्हे की वरच्या थरांत मनमानेल तशी रचना करून ती

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

खालच्या थरांवर लादावी. खालच्या थरांमध्ये पूर्वीपासून रूढ झालेली जी परिभाषा असेल ती वरच्या थरांमध्ये कायम राखावी, हा एकरूपतेचा खरा अर्थ होय.

सध्या चालू असलेली परिभाषा सर्वांगपरिपूर्ण आहे, तींत सुधारणा करण्याचीं आवश्यकता नाही, असें कोणी समंजस मनुष्य म्हणणार नाही. पण अशी सुधारणा योजनापूर्वक, एका दमांत करावयाची असल्यास तिच्यासाठी सांघिक व प्रातिनिधिक प्रयत्न हवा. आणि असा प्रयत्न करावयाचा तो पूर्वीपासून रूढ असलेल्या परिभाषेची मान्यता गृहीत धरून, तसेंच आजपर्यंत झालेले परिभाषा-निर्मितीचे प्रयत्न जमेस धरून करावयास पाहिजे. अशा प्रयत्नानेच शिक्षणाची प्रगति साधेल. रघुवीरांच्या प्रयत्नांना प्रातिनिधिक अधिष्ठान मुळीच नाही; आणि पूर्वीपासून रूढ असलेली परिभाषा व पूर्वीच्या विद्वानांचे प्रयत्न जमेस धरावयास ते तयार नाहीत. त्यांच्याशीं सहकार्याने काम करणाऱ्या प्राध्यापकांना Sulphur ला गंधकासारखा सर्वमान्य प्रचलित शब्द सुचविण्याचीहि शिराणी नव्हती. Oxygen, Hydrogen, Sulphur यांना प्राणवायु, उज्ज, गंधक हे प्रचलित शब्द नकोत, तर जारक, उदजन, शुल्बारि हेच शब्द पाहिजेत! Gravity ला गुरुत्वाकर्षण नको, तर भ्वाकृष्टि असा मुखभंजक (jaw breaking !) प्रतिशब्द पाहिजे! अशा एकतंत्री पद्धतीनें हें परिभाषेचें काम झालेलें आहे. म. गांधींच्या प्रेरणेने वर्धा, नागपूर, जबलपूर येथील गो. से. कॉमर्स कॉलेजच्या तिन्ही संस्थांतून आज मराठी व हिंदीच्या द्वारें शिक्षण देण्यांत येतें. इंग्रजी माध्यम तेथे नाही. गेलीं पांच सहा वर्षें हा प्रयोग तेथे चालू असून डॉ. राजेंद्रप्रसादांच्या आशीर्वादाने पहिली स्नातकांची तुकडी दोन वर्षांपूर्वी उत्तीर्ण झाली. पण तिकडेहि तेथील अध्यापकांचा त्याबाबत काय अनुभव आहे व त्यांच्या काय अडचणी आहेत यासंबंधी वरील व्यक्ति किंवा शासक संस्थांकडून विचारणा झाल्याचें ऐकिवांत नाही.

समाजाची विचारशक्ति जागृत होत आहे अशा या काळांत असली हुकूमशाही पद्धत फार काळ टिकत नाही. डॉ. रघुवीरांनी दिलेल्या परिभाषेनुसार श्री. घनश्यामसिंह गुप्तांच्या भाषांतर समितीने भारताच्या राज्यघटनेच्या मसुद्याचें केलेलें 'प्रारूप' जेव्हा त्याज्य ठरलें तेव्हा घटनासमितीच्या अध्यक्षांना सर्व भारतीय भाषांच्या तज्ज्ञांची एक प्रातिनिधिक समिति नेमावी लागली. या समितींतहि रघुवीरांचेंच शब्द मान्य करून घेण्यासाठी जरी विश्वप्रयत्न करण्यांत आले तरी एकतंत्री ' हम करेंगे ' पद्धतीला तेथे हादरा बसला यांत शंका नाही. डॉ. रघुवीरांची शास्त्रीय परिभाषा इंटर-युनिवर्सिटी बोर्डाने मान्य केलेली नाही, इंडियन सायन्स कांग्रेसने मान्य केलेली नाही, किंबहुना कोणत्याहि प्रातिनिधिक संघटनेने मान्य केलेली असल्याचें ऐकिवांत नाही. अशा स्थितींत केवळ सत्तेच्या जोरावर ती मध्यप्रदेशांत लादण्याचा प्रयत्न करण्यांत यावा हें येथील विद्यार्थ्यांचें, शिक्षकांचें व पालकांचें–म्हणजे सर्व जनतेचें दुर्दैव होय.

खरें दुर्दैव याहूनहि मोठें आहे. भारत सरकारच्या शिक्षणखात्याने सर्व देशाकरितां एकरूप परिभाषा तयार करणें आणि हिन्दीमध्ये शास्त्रीय विषयांचीं पाठ्यपुस्तकें तयार करणें, हीं कामें हातीं घेतलेलीं असून याकरितां अखिल भारतांतील नामवंत शास्त्रज्ञांचें एक ' शास्त्रीय परिभाषामंडळ ' (Board of Sientific Terminology) स्थापित केलें आहे. केंद्रीय शिक्षण सल्लागार मंडळाने, तसेंच या शास्त्रीय परिभाषामंडळाने शास्त्रीय विषयांत आंतरराष्ट्रीय परिभाषाच

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

स्वीकारण्यांत यावी असा स्वच्छ ठराव केला असून त्या ठरावानुसार दिल्लीस कार्म चालू आहे. या ठरावानुसार आंतरराष्ट्रीय परिभाषा, म्हणजे आपल्या देशांत प्रचलित झालेली इंग्रजी परिभाषा स्वीकारण्यांत येऊन थोड्या कालावधींत हिंदीमध्ये लिहिलेली शास्त्रीय विषयांचीं पुस्तकेंहि बाहेर पडतील. केंद्रसरकारांचें हें धोरण आणि हें कार्य राज्यसरकारांना स्वीकारावें लागेल हें उघड आहे. असें झालें म्हणजे डॉ. रघुवीरांची ही परिभाषा व तदनुसार लिहिलेलीं हीं पुस्तकें यांचें काय होईल ? प्रचंड खर्च करून उभारलेला हा डोलारा कोसळून पडेल हें उघड आहे. हें सर्व भविष्य उघड दिसत असतां ही परिभाषा व हीं पुस्तकें विद्यापीठीय अभ्यासक्रमांत तर लादण्यांत आलींच आहेत, पण शालेय शिक्षणांतहि लादण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे, हें या राज्यांतील जनतेचें महान दुर्दैव होय. माध्यमिक शिक्षणाचा यामुळे विचका होणार आहे.

ही सर्व परिस्थिति लक्षांत घेऊन विदर्भ साहित्य संघाच्या परिभाषा समितीने याबाबत एक ठराव केला आहे. या ठरावांत पुढील मुद्दे मांडण्यांत आले आहेत—

१ मॅट्रिकपर्यंतची परिभाषा मराठींत पूर्वीपासून रूढ झालेली आहे ती बहुतांशीं पर्याप्त व योग्य आहे;

२ तिच्यांत कांही बदल करावयाचा झाल्यास तो जनतेला विचारांत घेऊन प्रतिनिधिक स्वरूपाच्या संघटनेच्या द्वारा करण्यांत यावा;

३ एका व्यक्तीने—मग ती कितीहि विद्वान असो—केलेली परिभाषा शिक्षण-क्षेत्रावर लादूं नये;

४ मराठी व हिंदी भाषांचा प्रश्न या राज्यापुरताच मर्यादित नाही; मराठीकरितां परिभाषा बनवायची तर ती मुंबई व हैद्राबाद या राज्यांतील मराठी भाषिकांच्या संमतीने व सहकार्यानेच बनवितां येईल;

५ शास्त्रीय परिभाषेचा प्रश्न केंद्रीय शिक्षणखात्याने हातीं घेतला आहे; तेव्हा आपल्या राज्यसरकारने आपलें धोरण केंद्रीय शिक्षण खात्याच्या धोरणाशीं सुसूत्र असें ठेवावयास पाहिजे.

परिभाषेचा हा विषय खरोखरी शिक्षकांच्या जिव्हाळ्याचा आहे. कांही सन्मान्य शिक्षकांनी वि. सा. संघाला पत्र लिहून या प्रश्नाला चालना दिली हें उत्तमच झालें. यापुढेहि मुख्यतया शिक्षकवर्गानेच याच्यांत लक्ष घालून आजवर उत्तम रीतीने बसलेली शैक्षणिक परिभाषेची घडी विसकटून टाकण्याच्या या प्रयत्नांचा प्रतिकार केला पाहिजे. ठिकठिकाणच्या शिक्षकांनी संघटित होऊन या विषयावर सांगोपांग विचार करून आपला अभिप्राय सरकारला व बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशनला कळविल्यास आपलें लोकमतानुवर्ती आणि लोकहितैषी सरकार त्याला मान देणार नाही, हें संभवत नाही.

या विषयाची निकड केवळ मराठीपुरतीच आहे असें नाही. संकटाची कृष्णच्छाया हिंदीवरहि तितकीच दाट आहे. डॉ. रघुवीरांचा ‘ शुल्बारि ’, त्यांची ‘ भ्वाकृष्टि ’ आणि त्यांचें ‘ प्रन्हासन ’ मराठीला नको आणि हिंदीला हवेंसें वाटतें अशांतला बिलकुल प्रकार नाही. हिंदी भाषिकांनीहि या संबंधांत तळमळीने चळवळ करावयास हवी, नाहीतर त्यांच्या सतेज भाषेचें गंगा यमुनांच्या प्रदेशाप्रमाणे लोभनीय सुगम स्वरूप नाहीसें होऊन तें रुक्ष तिबेटी पहाडांप्रमाणे दुर्गम बनेल. *

---

* संघाच्या परिभाषा समितीने एकमताने मंजूर केलेला ठराव या अंकांत इतरत्र दिला आहे.—संपादक युगवाणी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विचारतरंग ★ २ ★ चिकित्सक

★

टिळक आणि सामाजिक सुधारणा या विषयाचें आतापर्यंत इतकें चर्वितचर्वण झालें आहे की तो विषय पुन्हा उकरून काढणें म्हणजे नाहक शिळ्या कढीला ऊत आणण्यासारखें होणार आहे, असें कित्येक वाचकांना वाटण्याचा संभव आहे. मला असें वाटतें की जसजसे अधिकाधिक दिवस जात जातील तसतसें टिळकांच्या जीवन-दृष्टीचें तटस्थ भूमिकेवरून मूल्यमापन होऊं लागेल आणि त्यायोगे त्यांच्या व्यक्ति-त्वाचें यथान्याय्य दर्शन होण्यास पुष्कळच मदत होऊं शकेल. टिळकांचा सामाजिक सुधारणांकडे पाहण्याचा दृष्टिकोण कशा स्वरूपाचा होता हा विचार करण्यासारखा एक महत्वाचा प्रश्न आहे. सामाजिक सुधारणांच्या इष्टानिष्टतेविषयी बोलतांना टिळक कित्येकदा ब्रह्मदेशाचें उदाहरण देत असत असें सांगतात. ब्रह्मदेशाचें उदाहरण घेऊन त्यांनीं केलेलें सामाजिक सुधारणासंबंधीचें विवेचन आपणांस न. चिं. केळकरांनी लिहिलेल्या टिळकचरित्राच्या पहिल्या खंडांत वाचावयास मिळतें. त्यांत टिळक सांगतात,—"जातिभेदाचा अभाव, धर्मस्वातंत्र्य, स्त्रीशिक्षण, स्त्रियांस सर्व व्यवहार करण्याची मोकळीक, प्रौढविवाह, विधवाविवाह, काडी मोडणें, खाण्यापिण्याची पूर्ण मुभा, वगैरे ज्या ज्या सामाजिक व्यवस्था, सुधारणा म्हणून घडवून आणण्याकरिता हिंदुस्थानांतील कित्येक विद्वान गृहस्थ आज पुष्कळ वर्षे खटपट करीत आहेत, त्या सर्व सुधारणा ब्रह्मदेशांत इंग्रजी राज्य होण्यापूर्वीच झालेल्या होत्या असें त्यावरून आपल्या सहज लक्षांत येईल. परंतु त्यामुळे ब्रह्मी लोकांचे आपआपसांतील द्वेष कमी होऊन स्वाभिमान व्हावा तितका जागृत झाला नाही व अखेरीस या त्यांच्यांतील दुहीमुळेच थीबाचें राज्य लयास गेलें, असें इतिहासावरून दिसून येतें... सामाजिक सुधारणा नको असें माझें म्हणणें नाही. घरांतील कांही अडचणी त्याने दूर होऊन आपल्या समाजास त्यापासून कांही फायदा होईल. पण राष्ट्रीय किंवा औद्योगिक उन्नति सामाजिक सुधारणा झाल्याशिवाय व्हावयाची नाही असें जें कित्येक विद्वानांचें म्हणणें आहे तें चुकीचें आहे असें सीलोन व ब्रह्मदेश यांतील बौद्धधर्मी लोकांच्या स्थिती-वरून चांगलें प्रत्ययास येतें...स्वदेशाबद्दल प्रीति, परस्परांतील क्षुद्र भेद किंवा द्वेष विसरून जाऊन देशकार्याकरिता जुटीने काम करण्याची प्रवृत्ति व संवय, परदेशांत जाऊन नवीन उद्योगांचें ज्ञान संपादन करून घेण्याची उमेद, आपल्या राष्ट्राचें वैशिष्ट्य कायम ठेवण्याबद्दल आस्था इत्यादि गुण राष्ट्रीय उन्नतीस आवश्यक आहेत. हे गुण आपण इकडे ज्यास सामाजिक सुधारणा म्हणतों त्यावर अवलंबून नाहीत, इतकेंच नव्हे तर अशा प्रकारची जेथे सुधारणा झाली आहे तेथेहि या गुणांचा अभाव असूं शकतो, असें ब्रह्मदेशाच्या स्थितीवरून स्पष्ट नजरेस येतें." हा उतारा जर आपण काळजीपूर्वक वाचला तर आपणांस असें दिसून येतें की त्यांत टिळकांनी राष्ट्रीय

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सद्‌गुणांत निस्स्वार्थ देशभक्तीचा आणि राष्ट्रीय वैशिष्ट्याच्या म्हणजे परंपरेच्या अभिमानाचा अंतर्भाव केलेला आहे आणि राष्ट्रीय उन्नतीला सामाजिक सुधारणा कोणत्याहि प्रकारें उपकारक नाहीत असा जणुं त्यांनी ठाम सिद्धान्तच मांडलेला आहे. याचा अर्थ असा होतो की त्यांचा सामाजिक सुधारणेला असलेला विरोध हा परंपरेच्या अभिमानामुळे आणि परंपरारक्षणाच्या प्रवृत्तीमुळे उत्पन्न झालेला होता.

टिळकांच्या सामाजिक सुधारणेबद्दल असलेल्या उपेक्षाबुद्धीची आचार्य जावडेकरांनी निराळ्या प्रकाराने कारणमीमांसा केलेली आहे. टिळकांच्या सामाजिक सुधारणेच्या विरोधामागे त्यांची व्यावहारिक मुत्सद्देगिरी होती असें आचार्यांचें म्हणणें आहे. त्यांनी आपल्या 'आधुनिक भारतां'त लिहिलें आहे की "लो. टिळकांना राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या सिद्धीच्या दृष्टीने धार्मिक व सामाजिक क्रांतीवर राष्ट्रांतील तरुणांची इतकी शक्ति घालविणें योग्य वाटत नव्हतें. म्हणून त्यांनी आपल्या संस्कृतीच्या अभिमानाच्याच परंपरागत पायावर जहाल राजकारणाचा पाया घातला. आगरकरांच्या जहाल राजकीय विचारांचा पाया केवळ जनतेचें वाढतें दारिद्य आणि सत्यनिष्ठेची सार्वत्रिक आकांक्षा हा होता. लोकमान्यांना असें दिसत होतें की सामान्य समाजांत असे लक्षावधि लोक आहेत की त्यांना सामाजिक सुधारणा मान्य नाहीत पण ते स्वसंस्कृतीचे अभिमानी आहेत. त्यांच्यांत हा संस्कृतीचा अभिमान उत्पन्न केला तर ते स्वराज्यासाठी झगडण्यासाठी तयार होतील. ते तसे तयार झाले व त्यांच्यांत जोष उत्पन्न झाला म्हणजे स्वराज्याच्या मार्गांत त्यांना आड येणारे सामाजिक व धार्मिक निर्बंध ते दूर करतील, त्यासाठी एवढें अकांडतांडव करावयास नको. शिवाय आम्ही आज मागे राहिलों असलों तरी आमची संस्कृति हीन दर्जाची नाही तर ती श्रेष्ठ दर्जाचीच आहे. मग उगीच आमच्या संस्कृतीचा पाया उखडण्याचा आग्रह कां ? अशीहि त्यांची वृत्ति होती."

येथे एक अत्यंत नाजूक प्रश्न उत्पन्न होतो. तो हा की टिळकांचा सामाजिक सुधारणेला असलेला जो विरोध, त्याच्या मुळाशीं त्यांची परंपरागत संस्कृतीच्या अभिमानाची भावना होती, की परंपराप्रिय जनतेचीं मनें न दुखविण्याची व्यावहारिक मुत्सद्देगिरी होती ?

या प्रश्नासंबंधी आगरकरभक्त अळतेकरांनी दिलेलें स्पष्टीकरण टिळकभक्तांना कांहीसें कडवट वाटण्यासारखें आहे. त्यांचें म्हणणें असें आहे की सन १८८४ पर्यंत "आगरकर आणि टिळक यांचा 'शिवस्य हृदयं विष्णुर्विष्णोश्च हृदयं शिवः' असा संबंध होता. पुढे क्रमाक्रमाने टिळकांची पगडी फिरली" आणि लोकमताच्या दडपणाला बळी पडून त्यांनी सामाजिक सुधारणेला विरोध करायला सुरवात केली.

आपणांस या प्रश्नाचा आगरकरभक्त म्हणून वा टिळकभक्त म्हणून विचार करावयाचा नसून सत्यभक्त म्हणून विचार करावयाचा आहे. टिळकांना सामाजिक सुधारणा नको होती, ती परंपरारक्षणाकरिता नको होती की लोक नाराज होतात म्हणून नको होती ? दोन्ही कारणें एकत्र संभवणें विसंगत दिसतें; आणि त्यामुळेच चिकित्सक वाचकांनी सत्यान्वेषणाच्या बुद्धीने या नाजूक प्रश्नासंबंधी विचार करावा असें नम्रपणें सुचवावेसें वाटतें.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जसं त्यांनी राज्य केलं....

सुमतिदास

※

[तरणे जीव प्यार करतात. केलेभरलेले विरोध करतात. मग कुणी तरी हारतं, कुणी तरी जिंकतं. तरुण जिंकले तर लग्न. केलेभरले जिंकले तर विरह, त्याग, हायहाय किंवा मृत्यु. कधी कधी मेल्यावरहि पुनः दिसल्या वावरल्याचा भास. त्यांतून निर्माण होते गोष्ट.

तथापि असा विरोध नसतांना ज्या कित्येक लघु घटना कथा होऊन जातात त्यांतली ही गोष्ट आहे. प्यार केल्यावर रडलंच पाहिजे किंवा वाहवलंच पाहिजे असं नाही. लग्नेंहि होऊन जातात नाही कां !

—संपादक]

हिंदुस्थान देश. त्यांतला वऱ्हाड. त्यांतलं एक खेडं ! पावसाळ्याचे दिवस. सकाळीं पावसाचा रंग नव्हता म्हणून सारे वावरांत गेले होते. दुपारी दोन वाजतां अचानक पाऊस आला. खूप जोरांत. सारे झाडाखाली आसऱ्याला गेले. पाऊस बराच रमला. नदीला सपाटून पूर पाणी आलं.

अलिकडच्या काठीं कुंडलीकाचा मळा होता. आज झोपडींत तो एकटाच होता. त्याची तब्येत जरा बरी नव्हती म्हणून तो उपाशीच झोंपला होता. पाऊस थांबल्यावर तो उठला. दिसलं काय ! तर भयंकर पूर ! नाला दुथडी फुटून चालला. पलिकडच्या काठी चंद्री अन् आणीक कांही बायका अडकून पडलेल्या. चंद्रीनं नदीपल्याड जातांना कुंडलिकाची भाकर आणून दिली होती पण त्यानं अजून खाल्ली नव्हती.

चंद्री त्याच्या शेजाऱ्याची मुलगी. दोघं लहानपणीं एकत्र खेळलेले. दोघांनी एकमेकांना हेरून ठेवलेलं !

दिवस मावळाया चालला होता. कुंडलीक आपल्याशी म्हणाला की वघळाचें पाणी रात्रीशिवाय उतरणार नाही, वावरांतल्या पाटालाहि ओढ आहे. म्हणून गांवातूनहि कोणी इतक्यांत येणार नाही. चंद्रीची माय तिची वाट पाहील. म्हाताऱ्या विठूजीलाहि काळजी लागलेली असेल. चन्द्रीला इतका वेळ पावसांत भिजल्यामुळं सर्दी, ताप येईल; आतां माझा ताप हलका आहे. मीं तिला पुरांतून काढलं तर फार त्रास होणार नाही. माझी सहनशक्ति बरी आहे. चंद्री माझ्यासाठी इतकं करते...मी तिला काढायलाच पाहिजे.

त्यानं बागलीच जवळची गाड धांद म्हणजे मोठा दोर काढला. एक टोंक झाडाला बांधलं व दुसरं आपल्या कमरेला बांधून पुरांत उडी मारली. पाणी चढावर

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होतं. पहिल्या भरांत कुंडलीक नदी पल्याड गेला. त्या सान्याजणींपैकी प्रत्येकीला वाटे कुंडलीकानं मला पुरांतून काढावं. माझा तान्हुला घरी रडत असेल; दादला घरी उपाशी असेल; माझी दुधाची म्हैस बांधायची राहिली; पाखेवाला दिवा न्यायचा राहला.......!

पण तो चंद्रीलाच म्हणाला—

"चंदु चालतु का ? भिनार नस्सील तर चाल. तुलें मी नेतो." ती म्हणाली, "ने." तिनं खुरपं कमरेंत खोचलं अन् भाकरीचा पाल्व वोळांत घातला. कुंडलीकानं कमरेचा दोर नाल्यालागूनच्या झाडाला ताणून बांधला. चंद्राहि ओढूं लागली. तो पाण्यांत उतरला.

"चंदु, तूं माझ्या पाठीवर बस."

ती पाण्यांत उतरली. व त्याच्या पाठीला चिकटली. त्याच्या गळ्याभंवती हात टाकले,

"चंदु, तूं माझा जीव घेशील गळा दाबून ! एक हात काखंतून घाल." तिनं तसं केलं व म्हणाली, "मले भेव वाटते रे कुंडलीका !"

"माझ्या जीवांत जीव हाये तंवरक भिऊं नको आन् मी सांगतों तसं आइक."

तो दोराला धरून नदींतून जाऊं लागला. पाणी चढावर होतं. पाण्याच्या एका मोठ्या लोंढ्याबरोबर काट्यांचा फास वहात आला, व त्याच्या दोराला अडला, मार्ग बंद झाला.

"आत्ता ह्यो फास जाईल. तूं दोराले अेक हात दे. मी थकाय लागलो." तिनं तसं केलं. पण फास लवकर वाहून जाईना. मार्ग मोकळा होईना. इकडं तर कुंडलीक थकूं लागला. अितक्यांत देवाकरणीनं मोठा लोंढा आला. फास निघून गेला. पण तोंवर चंद्री थकून गेली. फास गेल्यावर तो म्हणाला, "अशीच माझ्या खांद्यावर हात देऊन अेका हातांत धांद धरून चाल." तिला चालवेना ती म्हणाली, "मी पाठीवरच बसतो !" तो म्हणाला, "बस", तर ती बसली. तो पाणी तोडूं लागला. मधोमध प्रवाहाच्या भर धारेंत आला. एक लाकडाचा मोठा ओंडका वरून वहात आला. तिला त्याची भयंकर भीति वाटली. ती किंचाळली. तो थांबला पण तिचं ओझं आतां त्याला भारी होऊं लागलं होतं. पाणी जास्त ओढत होतं. ओढीनं चंद्री तिरसी तारसी होत होती. त्यानं दम घेतला. ओंडकाहि निघूनं गेला. पण त्याचे हात आता गळून आले होते. तो म्हणाला, "मले तुहा भार आता लई व्हया लागलाय !"

इतक्यांत तिला प्रवाहांत एक मोठा काळा जहर साप वाहतांना दिसला. ती भयंकर भ्याली. मोठ्यानं किंचाळली. तिचे हात सुटले. कुंडलीकानं अेका हातानं दोर धरून दुसऱ्या हातानं तिला सांवरून कुशींत घेतलं. ती त्याच्या छातीला चिकटली. तो म्हणाला, "भेऊ नोको, माझ्या खांद्यावर मान टाक" तिनं तसं केलं. कुंडलीकानं निदानीचा जोर काढला. खांद्यावर दोर घेऊन तो निघूं लागला. धार फुटली. जोर कमी लागूं लागला. पण तो खूप थकला होता. परत अेकदा जोर काढून तो काठावर आला. दोघंहि ओले गच्च !

ती त्याला चिकटलेली होती. तिच्या नाका तोंडांत पाणी गेलं होतं. वादळानं ती थंड पडली होती. भीतीनं मूर्च्छित झाली होती. कुंडलीकानं तिला गळ्यातऊ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

छातीवर घेऊन हातावर झोपडींत आणलं. खाटेवर टाकलं. चार कोरड्या गवताच्या पेंड्या काढल्या. चकमक झाडून आग केली. तिच्याजवळ शेक केला. ती त्या उबेनं हळूंहळूं देहावर आली. त्याची काळजी दूर झाली. त्यानं आपलं कोरडं धोतर तिच्याजवळ दिलं व म्हणाला, "चंदु, वलं लुगडं तूं सोडून हे धोतर नेस. मी आग्हाटी होतों मंग बलाव मले." तो आपलं कोरडं कुडतं घेऊन बाहेर गेला. त्यानं कुडतं घातलं. तिनं धोतर नेसलं व हांक मारली. दोघंहि शेकाजवळ बसले. जरा गरमी आल्यावर त्यानं आपली भाकर काढली,

"चंदु ! आपन भाकर खाऊं ! हे घे त्वांच आनली होती न्हवं ! "

" म्यां करून आनली अस्ती तं खाल्ली अस्ती "

" तूं आनशील का कही माझ्यासाठी भाकर करून "

" हो आनीन, आनीन पन तूं नंबरदार, आमी गरीब मजूरदार. तू कायले माझ्यासंग लगीन करशील ! "

" हो करीन अं ! "

" माही शप्पत ? "

" तुही आन बा ! हे घे वचन ! पन तू पाय बरं ! "

" किती चांगला हायेस कुंडलिकारे तू ! "

" तू काय कमी हायेस व्हय् ! म्या कईचीच हेरली होती तुले "

त्यानं भाकरीचा घास मोडून तिच्या तोंडांत घातला. तिनंहि अेक घास मोडून त्याच्या तोंडांत घातला. त्यानं तिचा हात धरला. अितक्यांत विठूजी तिथं आले. दोघंहि लाजले. चंद्रीनं सगळं सांगितलं. कुंडलिकानं मागणी घातली. विठूनं हो म्हटलं! आतां ये म्हणा पाऊस, भर म्हणा वघळ नाले. ये म्हणा काटे आडवे. दीस म्हणा जहरी नाग; पल्याड जाऊं, तेव्हाच राहूं !

रोज अेव्हांच नेमाने

रोज अेव्हांच नेमाने
धडधड करी ऊर
अनाहूत वाटतसे
आगळीच हूरहूर.

रोज याच वेळीं कसें
भ्रमिष्टतें माझें मन?
उठे अन्तरीं काहूर
चित्त विपण्ण विषण्ण!

कळेना का अकारण
नेत्र माझे पाणावती
गूढ, अबोध वेदना
उठे क्षणोक्षणीं चित्तीं.

कांही रुचेना, सुचेना
जडावतें माझें शरीर,
तरारल्या आसवांनी
दृष्टि फिरे भिरभिर.

होतों शिथिल, अस्वस्थ
विकल अन् अगतिक;
वाढतीच प्रतिक्षणीं
व्यथा माझी अनामिक.

—आणि हळूंच चमके
तेज माझीया डोळ्यांत;
कारण ह्या बेचैनीचें
मग उलगडे क्षणांत.

अकस्मात उत्कंठेने
कान टवकारले जाती—
लागे गोड चाहूल अन्
तुझ्या सखे पावलांची !

—राम शेवाळकर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मेघमल्हार

★

तारकांच्या नीरांजनांचं अंजन डोळ्यांत भरलं.
चंद्रिकेच्या हिमकिरणांनी शरीराला नाहूं घातलं.
आषाढांतल्या ' मेघदूतां 'चं रसायनहि पिऊन पाहिलं.
पण—
हृदयाची आग कांही केल्या शांत होत नाही रे.
कमलिनीची पाकळी न् पाकळी करपून गेली आहे.
कशानं ? कुणास ठाऊक !—खूप प्रामाणिक राहूनहि हृदयांतल्या भावछटा शब्दांनी व्यक्त करता येत नाहीत.
ह्या आगीची जाणीव असती तर—
मनूला आपल्या ' स्मृतीची ' विस्मृति नसती कां पडली ?
अश्वमेघ आणि राज्यसूय—
कशाला केले असते सम्राटांनी हे यज्ञ ?
तुझ्याकडे येऊं ? तूं करशील या होमाची पूर्तता ? कमलिनीची पाकळी न् पाकळी फुलवशील तू ?
...तिच्या सौरभ-सर्वस्वाचं अर्घ्यप्रदान करीन मी तुला.
जग...
जग काय म्हणेल ?
कांही म्हणणार नाही.
इतकं वाईट आहे जग ? आत्मसमर्पणाला विरोध करण्याइतकं ?
शंकरानं मेघमल्हार म्हणावा म्हणून तपश्चर्येचा दीपकराग आळविणाऱ्या पार्वतीला काय म्हटलं जगानं ? स्वयंवराच्या आधीच रामचंद्राकरिता हृदयाच्या पायघड्या अंथरणाऱ्या सीतेला काय म्हटलं जगानं ? आत्मसमर्पणाच्या आवेगानं श्रीकृष्णाबरोबर पळून जाणाऱ्या रुक्मिणीला...दमयंतीला...
मग...मलाच कां म्हणून......?
पार्वतीचं तेज, सीतेचं पावित्र्य, रुक्मिणीचं साहस, दमयंतीचं सौंदर्य...
आत्मार्पणाची ओढ...
...आणि यापेक्षाहि पुष्कळसं अधिक...
सारं, सारं सामावलं आहे माझ्या हृदयांत.
मग ?
गाशील ना रे तू मेघमल्हार ?
अन् करशील ना माझी सारी आग शांत ?...?...

—सुरेश डोळके

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मनाच्या अहंसंरक्षक योजना

शं. कृ. दाणी

★

मनाच्या अहंसंरक्षक योजना हा मानसशास्त्राचा पारिभाषिक शब्दप्रयोग आहे. पुष्कळांना साहजिकच तो दुर्बोध वाटेल. म्हणून त्याचें प्रथमतःच स्पष्टीकरण करणें इष्ट आहे. नापास झालेल्या महत्वाकांक्षी विद्यार्थ्याच्या मनःस्थितीची आपण कल्पना करा. त्याच्या अहंकाराला जबरदस्त धक्का बसतो. मन उदास होतें, आत्मविश्वास ढासळतो. स्वतःच्या प्रतिष्ठेला सुरुंग लागल्यासारखें वाटतें. अपयशाने झालेल्या अपमानाची मनाला टोचणी लागते. ती सहन न होऊन कित्येक आत्महत्या देखील करतात. दुःख टाळण्याची ही पळवाट स्वीकारणारे अर्थात् फारच थोडे. आपल्या दुखावलेल्या अहंकारावर फुंकर म्हणून व आपल्या कोसळलेल्या प्रतिष्ठेला सावरण्याच्या उद्देशाने अपेशी विद्यार्थी स्वतःस दूषण देण्याचें टाळतो. कठीण पेपर, अन्यायी परीक्षक, काल्पनिक शारीरिक व्यथा यांच्या माथीं आपल्या अपयशाचें खापर फोडून स्वतःचा अभिमान तो टिकवून धरतो. ही स्वतःचीच फसवणूक आहे, आपण आपली खोटी समजूत घालीत आहोंत, याची मनाला क्वचितच जाणीव असते. पण ह्या अजाणता मनांत घडणाऱ्या आत्मवंचनेने आत्मप्रतिष्ठा कायम राहते. अहं म्हणजे स्वतःविषयीं तुच्छता आणि विषाद वाटण्याचें टळतें. अज्ञातऱ्हेने स्वतःचा अभिमान आणि प्रतिष्ठा ज्या सूक्ष्म आत्मवंचनेने टिकून राहते, त्यांतील मूलभूत व्यापारांना मनाच्या अहंसंरक्षक योजना ही संज्ञा दिलेली आहे.

अपयशी विद्यार्थ्याप्रमाणे खोट्या सबबी सांगून अथवा बनावट कारणें पुढे करून आत्मसमर्थन करणें ही अशीच एक योजना आहे. इसाप-नीतींतील कोल्हा आणि आंबट द्राक्षांची गोष्ट सर्वांना माहितच आहे. आपणांस न मिळणारी वस्तु अप्रतिम असली तरी ती वाईटच आहे, नकोच ती, असें पोकळ आत्मसमाधान करून निराशा आणि खिन्नतेपासून मनुष्य स्वतःचें संरक्षण करतो. वस्तुस्थितीचा अहंकारास अनुकूल आणि पुष्टिदायक असा विपर्यास करण्यांत येतो. पैसा हें पापाचें मूळ आहे ह्या भावनेने दरिद्री माणसें संतोष पावतात. भार्या रूपवती शत्रुः असें म्हणून रूपहीन पत्नीच्या आंतरिक गुणसौंदर्याचे पोवाडे गाणारे यजमान पुष्कळदा नजरेस येतात. आपल्या आवाक्यांबाहेरील सर्व चांगल्या गोष्टींना आपण नांवें ठेवतों. ह्या मनोवृत्तीचीच दुसरी बाजू म्हणजे आपल्या दोषांचा, उणीवांचा व हिणकस वस्तूंचा गुणगौरव करणें. न मिळणारी द्राक्षें आंबट असतात त्याचप्रमाणे नशीबाला आलेलें लिंबू गोड मानण्यांत येतें. मिळेल त्यांत समाधान मानावें, जें कांही होतें तें भल्याकरितांच होतें, ह्या वाक्प्रचारांनी कित्येक हताश जीवांना दिलासा दिला आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आपली बाजू राखण्यासाठी खोटें आत्मसमर्थन करण्याची खोड विचारांच्या शुद्धतेला बाधक ठरते. स्वतःचें मत वाटेल त्या वितंडवादाने सिद्ध करण्याचा अनिष्ट प्रयत्न पुष्कळ विचारवंत करतात. कारण, त्यांत त्यांचा अहंकार गुंतला असतो. म्हणूनच वादाविवादाने मतपरिवर्तन घडवून आणणें प्रायः अशक्यच असतें. मनुष्य हा बुद्धिप्रधान प्राणी आहे, आणि त्याचीं सर्व मतें विवेचक बुद्धीवर आधारलेलीं असतात, असा सर्वसाधारण समज प्रचलित आहे. वस्तुतः आपल्या कित्येक विचारांचा उगम विवेचक-बुद्धींत नसून मनांत दडलेल्या भावना आणि वासनामध्यें असतो. आणि आपल्या बुद्धिप्राधान्याचा निर्वाळा स्वतःच्या मनाला आणि अितरांना देण्याकरिता त्या विचारांवर मागाहून बुद्धिवादाचा मुलामा चढविण्यांत येतो. ईश्वराचें आस्तित्व, आत्म्याची अमरता, वगैरे तत्वज्ञानानें शतकानुशतकें भरडलेल्या कल्पनांची हीच रड आहे. जीवनांतील संकटें, मृत्यूची अज्ञानामुळे वाटणारी भीति, किंवा विश्वाचें न उलगडणारें कोडें यांनी भांबावलेल्या मनाला सर्वशक्तिमान, दयाळू, सर्वज्ञ अशा जगत्पित्याची कल्पना अेकप्रकारचें समाधान आणि शांति देते. मरण म्हणजे आस्तित्वाचा अंत ह्या विचाराने कावराबावरा झालेला जीव पुनरपि जननंची आणि आत्म्याच्या अमरत्वाची गोड स्वप्नें पाहूं लागतो. अर्थात ह्या केवळ कल्पना आणि स्वप्नें नसून शाश्वत सत्यें आहेत, अशा विश्वासाशिवाय मनाला त्यांचा खरा साहारा वाटणें शक्य नाही. म्हणून हीं तत्वें सप्रमाण सिद्ध करण्याचा अव्याहत आणि आटोकाट प्रयत्न धर्म आणि तदनुषंगी तत्वज्ञानांतून होत असतो. आधुनिक शास्त्रीय शोधांची ओढून ताणून त्यांना पुष्टी देण्यांत येतें. आणि ज्यांना हा द्राविडी खटाटोप जमत नाही ते धर्म आणि विज्ञान यांचे प्रांत भिन्न आहेत असा विचार करून समाधान पावतात. ह्याच अहंसंरक्षक योजनेला बळी पडून कधी कधी शास्त्रज्ञ देखील आपल्या लाडक्या उपपत्तीशीं विसंगत असलेल्या पुराव्याचा तिला जुळेलसा अर्थ लावण्याचा यत्न करतो.

सर्वसाधारण माणसाच्या मनांत आढळून येणाऱ्या अहंसंरक्षक योजना वेडांतील विकृत मनोवस्थेंत आपलें विराट स्वरूप प्रगट करितात. वेड्याचें मन म्हणजे प्रत्यक्ष जगांशी विसंगत असलेल्या तऱ्हेवाईक कल्पनांचें आगरच. परंतु सर्व विसंगत गोष्टींचा आपल्या विक्षिप्त कल्पनांशीं सुसंगत असा अर्थ लावुन वेडें मन आपल्या भ्रामक विचारांचें समर्थन करतें. स्वतःला बादशहा समजणारा वेडा पुरुष इतर व्यक्तींवर कपटाने नागावल्याचा संशय घेऊन आपल्या दैन्यावस्थेचें समर्थन करतो. म्हणूनच भव्यतेच्या भ्रमांनी जखडलेलें वेड्यांचें मन निराधार संशयांनी पछाडलेलें असतें.

आपली पत राखण्यासाठी आत्मसमर्थन करणें हा मनाचा सहज व्यापार असल्याने त्याला पूर्णतया पायबंद घालतां येत नाही. पण जागरूक मनाला त्यापासून होणारी आत्मवंचना व तिचे आनुषंगिक दुष्परिणाम टाळता येतील. एक दुष्परिणाम असा की ह्या मानसिक योजनेने विचारधारा अशुद्ध होऊन सत्याचा विपर्यास करण्याची प्रवृत्ति बळावते. मन भ्रामक कल्पनांचें घरटेंच होऊन बसतें. शिवाय वेडगळ कल्पनांचें पूर्ण वेडांत पर्यवसान होण्याचा धोका असतोच. म्हणून नकली समर्थनाने अहंकाराचें पोषण करण्यापेक्षा वस्तुस्थिति मनांतल्या मनांत तरी कबूल करून क्षणभर पडते घेणें मानसिक आरोग्याला श्रेयस्करच ठरेल.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यानंतर दुसऱ्या एका अहंसंरक्षक योजनेचा विचार करूं. नाचता येईना अंगण वाकडें ह्या म्हणींत ती व्यक्त झाली आहे. स्वतःच्या चुका, दोष, उणीवा, अडचणी व अपयश याबद्दल इतरांना वा परिस्थितीला दोष देणें हा आत्मसमर्थनाचाच एक विशेष प्रकार आहे. तरीपण ती एक स्वतंत्र अहंसंरक्षक योजना मानण्यांत येते. अपयशी मनुष्य दैवाला दोष देऊन मोकळा होतो. स्वतःवर गुदरलेल्या संकटामागे इतरांचें कपट त्याला दिसूं लागतें. स्त्रियाच प्रोत्साहन देतात त्यांत आपला काय दोष अशी व्यभिचारी माणूस आपली सुटका करून घेतो. दुसऱ्यांना दोष देऊन स्वतःची पत राखण्याचा म्हणजेच अहंसंरक्षण करण्याचा उद्देश ह्या योजनेत उघडच आहे. दोष देणें याहून जरा निराळा प्रकार म्हणजे दोष दाखविणें. नेहमीं दुसऱ्यांचे दोष काढण्याची खोड पुष्कळांना असते. त्यामुळे स्वतःच्या दोषांची खेदजनक जाणीव टाळता येते. परदोषान्वेषण करीत राहिल्याने स्वतःच्या निर्दोषतेचें अप्रत्यक्ष आश्वासन मनाला मिळत असते. दुसऱ्यांच्या डोळ्यांतील कुसळ पाहण्याच्या नादांत स्वतःच्या डोळ्यांतील मुसळ साहजिकच न दिसून एकप्रकारचा आत्मसंतोष वाटतो. म्हणूनच भांडकुदळ माणसास स्वतः सोडून इतर सर्व माणसें भांडखोर वाटतात. पुष्कळदा अशा उलट्या बोंबा मारण्यांत स्वतःला वगळण्याचा हेतु नसून दुसऱ्यांनाहि आपल्याच पंगतीला बसविण्याचा उद्देश असतो. कारण इतर लोक आपल्यासारखेच आहेत ह्या विचाराने आपल्या दोषाबद्दल खजील होण्याचें कारण उरत नाही. एखाद्या सिनेमा नटीने समाजांतील साऱ्या सौभाग्यवतींच्या चारित्र्यावर शंकेचे शिंतोडे उडविले तर ते अहंरक्षणासाठी होत. सारांश, स्वतःच्या दोषांचा आरोप इतरांवर करून मन आत्मवंचना करीत असतें. सारखें दुसऱ्यांना दोष देण्याची किंवा त्यांचे दोष दाखविण्याची संवय केव्हांहि वाईटच. कारण एक तर समाजांत अशी व्यक्ति नावडती होते. दुसरें असें कीं स्वतःच्या दोषांचें यथार्थ दर्शन दुरापास्त होऊन आत्मोन्नतीचें मूळच खुंटतें. याशिवाय मनांत विकृति उद्भवण्याची भीति आहेच. मनोविकाराच्या एका प्रकारांत ह्याच मनोव्यापाराचा अतिरेक झालेला असतो. भ्रामक व निराधार संशयांची मनांत गर्दी उसळते. अन्नांत विष कालविलें आहे. कुणीतरी सारखा पाळतीवर आहे, आपल्या विरुद्ध कपट रचल्या जात आहे इत्यादि अवास्तव शंकांनी वेड्यांचें मन ग्रासलेलें असतें. त्यांचे भलें करायला जावें तर हे संशयात्मे त्याचा हटकून उलट अर्थ करतात.

स्वतःतील न्यूनता वा कमीपणा भरून काढणें, म्हणजेच न्यूनतापूर्ति. हा अेक निराळाच अहंपोषक मनोव्यापार आहे. स्वतःतील उणीवांचा, व्यंगांचा, अथवा दोषांची लज्जास्पद जाणीव मनुष्याला खजील करते. तो स्वतःला तुच्छ लेखूं लागतो. अहंकार दुखावला जातो अशावेळीं येन केन प्रकारेण आपला स्वाभिमान टिकविण्याची निकड मनाला भासते. म्हणून स्वतःतील उणीव भरून निघेल अथवा दोष नष्ट होईलसें वर्तन मनुष्य करूं लागतो. नियमित व्यायाम घेऊन आपली किरकोळ शरीरयष्टि तो बांधेसूद करतो. कष्टपूर्वक अध्ययन करून अज्ञानामुळे झालेला अपमान तो धुऊन काढतो. अशातऱ्हेने विधायक न्यूनतापूर्ति करून आत्मोत्कर्ष घडवून आणणें स्पृहणीय आहे अेवढेंच नव्हे तर विकारी न्यूनगंडापासून मुक्ति मिळविण्याचा तो अेक शास्त्रसंमत उपाय आहे. तथापि दुर्दैव असें कीं पुष्कळदा माणूस विधायक प्रयत्न बाजूस सारून खोट्या आढ्यतेने आपली प्रतिष्ठा टिकवूं पाहतो. साहजिकच त्याचें वर्तन दांभिक, विक्षिप्त व तऱ्हेवाईक होऊं लागतें. कांही तरी

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

करून आपलें व्यंग, दोष व उणीव लपविण्याचा तो प्रयत्न करतो. निर्धन पुरुष उधळा खर्च करून आपल्या तुटपुंज्या श्रीमंतीचा थाट मिरवितो. उथळ माणसें शद्बावडंबराने दुसऱ्यावर आपली छाप पाडूं पाहतात. भित्रीं मुलें नको तेथे धाडसी-पणा दाखवितात. कर्तृत्वशून्य व्यक्ती आत्मप्रशंसेचें हत्यार उपसते. स्वतःचा कमी-पणा लपविण्याचे हे अश्लाघ्य प्रयत्न माणसाचा अहंकार सावरून धरतात. पण स्वतःच्या कर्तृत्वाचें असें खोटें समाधान मिळवून मन आत्मवंचनाच करीत असतें. म्हणूनच अशा तऱ्हेची न्यूनतापूर्ति मनाच्या अहंसंरक्षक योजनांत गणल्या गेली आहे. सौंदर्याच्या अभावी नट्टापट्टा व नखरे यांचा अतिरेक करणें, कांहीतरी विदू-षकीपणा करून इतरांचें लक्ष स्वतःकडे वेधवूं पाहणें, स्वतःच्या निष्क्रियतेची भरपाई इतरांच्या कर्तबगारीविषयीं तुच्छता दाखवून करणें हीं सर्व याच योजनेचीं उदाहरणें आहेत.

कांही उदाहरणांत न्यूनतापूर्तीचा अतिरेक कळसास गेल्याने बरेंच अतिश-योक्तीचें वर्तन उलट मनोवृत्तीचें निदर्शक ठरतें. बाहेरून आत्यंतिक नम्रतेचें प्रदर्शन करणारी व्यक्ति आंतून गर्वाने फुगलेली असते. स्वतःचें चारित्र्य निष्कलंक ठेवण्या-बद्दल बाह्यतः अतोनात काळजी वाहणारा नीतिमत्तेचा आधारस्तंभ आंतून दुर्दमनीय वासनांनी पोखरला जात असतो. मुखावर कृत्रिम हास्य खेळवून मनुष्य आपली निराशा बळेंच लपवूं पाहतो. वेड्यांचें पुष्कळसें वर्तन ह्याच योजनेवर आधारलेलें असतें. संकटांच्या परमावधींत सर्वस्व नष्ट झालेला वेडा सारखा हंसत सुटतो.

न्यूनतापूर्तीचा एक विशेष प्रकार व्यवहारांत पदोपदीं आढळून येतो. थोरा-मोठ्यांच्या मागे मागे करणें, उच्चपदावर असलेल्या नातलगांचा आणि मित्रांचा नको तेथे सारखा उल्लेख करणें ह्या संवयी पुष्कळांना असतात. श्रेष्ठ व्यक्तीशीं तादात्म्य कल्पून आपल्या प्रतिष्ठेला पुष्टी देण्याचा त्यांत प्रयत्न असतो. यावरून कांही वेड्यांना स्वतः कुणीतरी थोर पुरुष असल्याचा भ्रम कां होतो, याची थोडी कल्पना येऊं शकते. थोर पुरुषांशी तादात्म्य पावणें नेहमीच विकारी ठरत नाही. उलट किशोरा-वस्थेंत असें तादात्म्य मुलांच्या मनाला उत्स्फूर्त करून जीवनांतील ध्येयनिर्मितीला मदत करते, मात्र आपल्या न्यूनतेवर झांकण टाकून खोटा मोठेपणा मिरविण्यासाठी त्याचा उपयोग करणें मानसिक आरोग्याला अपायकारक आहे.

अहंसंरक्षणाचा आणखी एक प्रकार विचारांत घेऊं. प्रत्यक्षांत न मिळणारें समाधान काल्पनिक मनोराज्यांत म्हणजेच दिवास्वप्नांत मिळविणें हा निराशेच्या दुःखापासून मनाला वांचविण्याचा एक प्रकार आहे. बसल्या जागीं मनाचे मांडे खाण्याची संवय बहुतेकांना असते. त्यामुळे निराश मनाला तेवढेंच बरे वाटतें. इच्छापूर्ति हे दिवास्वप्नांचें प्रमुख कार्य आहे. खऱ्या जगांतील सुख हुकमी आणि निर्मळ नसतें. पण कल्पनेच्या सृष्टींत सर्वप्रकारचें सुख मिळतें. अतृप्त आशा आणि आकांक्षा तेथे तावडतोब आणि विनायास फलद्रूप होतात. म्हणूनच आपलें दुःख, निराशा आणि अपमान यांचा विसर पडावा म्हणून मन दिवास्वप्नांच्या काल्पनिक जगाचा आश्रय घेतें. प्रत्यक्षांतील अपमानाचा वचपा केवळ कल्पनेतच काढल्याचें बहुतेकांच्या स्मरणांत असेलच. झिटकारल्या गेलेल्या प्रेमवीराचें दिवास्वप्नांत मनसोक्त मीलन होतें. त्याच्या शौर्याने, बुद्धिमत्तेने आणि सौंदर्याने ती दिपून जाते व उलट त्याच्याजवळ प्रेमासाठी पदर पसरते.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

किंवा स्वतःचा हृदयद्रावक अंत झाला आहे, आणि आता पश्चात्ताप वाटून ती आपल्या शवावर अश्रुमोचन करीत आहे, असें स्वप्न कल्पून देखील तेंच अंतिम यशाचें समाधान तो प्रेमवीर मिळवितो. अन्यायी जगाला केवळ कल्पनेच्या क्रियेने पश्चात्तापदग्ध करून कल्पनेतच त्याची सहानुभूति मिळविण्यांत दुखावलेल्या मनाचें खोटें कां होईना, पण समाधान होते.

अधूनमधून दिवास्वप्नांत गुंग होणें हा मनाचा सहजधर्म आहे. त्यामुळे दुःखाचा क्षणभर विसर पडतो, एवढेंच नव्हे, तर विधायक प्रयत्नांची रूपरेषा आंखण्यास त्यांची मदत होऊन हताश मनाला चेतना मिळते. परंतु कल्पनेच्या साम्राज्यांत सारखें रंगून जाणें मनोविकाराला आवाहन देण्यासारखेंच आहे. सभोंवतालच्या जगाची पारख सुटून त्याची जागा काल्पनिक जगाने घेतली की माणसाला वेड लागलें असें आपण म्हणतोंच. आपल्याच कल्पनेच्या तारेंत एखाद्या निवांत कोपऱ्यांत स्वस्थ आणि निश्चल बसलेले वेडे इस्पितळांत आढळून येतील. मनाचा असा पूर्ण तोल गेला नाही तरी सारखी काल्पनिक सुखाची कांस धरल्याने जीवनांतील खरें यश आणि समाधान झगडून मिळविण्यास मनुष्य नालायक ठरतो. स्वभाव एकलकोंडा होऊन जबाबदारीचें व दगदगीचें काम टाळण्याची प्रवृत्ति वाढते.

वेड्यांचे मनोव्यापार आपल्या मनांतील व्यापारांहून मूलत: भिन्न नाहीत, हें आता सांगायला नकोच. तेच मनोव्यापार निरोगी मनांत, वेडगळ मनांत आणि पूर्ण वेड्या मनांत कमीअधिक अंशाने आढळून येतात. ह्या व्यापारांचें विकारी कार्य हाणून पाडण्याचा एक उपाय म्हणजे मानसिक आत्मज्ञान—मनांतील घडामोडींची यथार्थ जाणीव. ह्या अहंसंरक्षक योजनांचें कार्य मनाला न कळत होत असल्यामुळेच आत्मवंचना होऊन आचारविचारांस वेडगळ आणि विक्षिप्त स्वरूप येतें. आपण आत्मसमर्थन करतों तें केवळ आपली बाजू राखण्याकरितां, बडेजाव मिरवितों तें केवळ आपलें गौणत्व लपविण्यासाठी, परदोषान्वेषण करतों तें स्वतःच्या दोषांची टोचणी नको म्हणून. अशा प्रकारची मनाला जाणीव होत राहणें हेंच मानसिक आत्मज्ञान, आणि हाच मानसिक निकोपतेचा महामंत्र आहे.

(आकाशवाणी नागपूरच्या सौजन्याने)

जीवनलहरी

–१–

चपळपणा बघुन तुझा
विजली लाजुन लपते
तेजाची नजरेने
मन–सुवर्ण चकाकतें
नृत्य तुझें बघुन असें
हृदय अर्पण करितां
केले तूं शत तुकडे
त्यांवरि नाचत असतां !—

–२–

सांगतसे जेव्हा कुणि
प्रेम–कथा या जगतीं
प्रेम तुझें आठवतें
डोळे ओले होती
कमलासम नेत्र तुझे
भुंग्यासम मन माझे
पाकळींत कैद करुनि
ठेविलेंस तूं अजुनी !—

—योगेश्वर अभ्यंकर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मधुनि मात्र—

★

उन्मादक गीतांची पखरण या जीवनांत !
मधुनि मात्र हृदय झरें कां न कळे आसवांत ?
जरि विसावलों कितीक "बापडीं" मदंतरांत,
मी कलंदरासमान वणवणतों त्रिभुवनांत !

●

भटकशी मजेत पांथ ! विश्व पाहण्या विराट !
माझी पण क्षितिजाच्या पार जात पायवाट.
आलेला वीट मला क्रमण्याचा तोच मार्ग,
"अल्विदा!" जगां म्हणून बनलेलों वीतराग !
पांथ ! मार्ग तव सुखकर पथिं हसती मधुशाला,
शर्वरीत धुंद मिठी उब जीवा द्यायाला !
ओसरतां रात्रीचा बहर, रंगतां पहाट...
प्रासाद-प्रांगणांत भैरविचा खुलत थाट.

●

मजला पण काय कमी? गगन निळें डोक्यावर !
थकल्यावर शिर ठेविन भू-माता अंकावर.
नीज मुर्दे घेइन मी लाडावत फुगेटून,
मायेची अंगाई दे थकवा संपवून.
मजसाठी अंबरांत रत्नांचा लखलखाट !
खुलतां नभ, "उठ सुहृदय!" करतिल खग किलबिलाट !
"सुहृद! ऊठ" रानफुलें मज चुंबुनि बोलतील,
पदचिन्हें पुनरपि या धरणीवर उमटतील !

●

बघतों मी विसराया झालें जें गतकालीं,
मातेची वत्सलता मजसाठी फुललेली.
मावळले जीर्ण खेद, लव न खंत मानसांत !
मधुनि मात्र हृदय झरें कां न कळे आसवांत ?

—सुरेश श्रीधर भट.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वैरीण

★

याच प्रशांत रातींत
 रातराणीच्या गंधांत
कर घालून करांत
 कधीं हिंडलों धुंदीत—१

याच प्रशांत रातींत
 चंद्रप्रकाशीं नहांत
स्वप्न उद्याच्या जगाचें
 डोळे मिटुनी पहात—२

याच प्रशांत रातींत
 दशदिशांच्या साक्षीत
पेला माझ्या रे प्रीतीचा
 दिला तुझ्या मीं करांत—३

याच प्रशांत रातींत
 माझी निघाली वरात
खुळ्या समाज भीतीने
 आलें दुज्या मी घरांत—४

याच प्रशांत रातींत
 मला तुझी ना सोबत
स्मृति उजाळितां वाटे
 झाली वैरीणहि रात—५

—मो. दा. देशमुख.

अनोळखी

★

ही कोण गडे ? –वेड जडे, ऊर धडधडे
घटकेत रडे, तोंच चिडे, लचकत मुरडे,
 —ही नूतन बाला !

घटकेत हंसे, तोंच रुसे, होत कसेंसें
लावीत पिसें, गोड दिसे, सोडि उसासे,
 —ही नूतन बाला !

पूर्वी न कधी देखियली, कोठुनि आली ?
हुरहूर कशी लावियली, लाजत गाली
 —ही नूतन बाला !

हळुवारपणें गुंगाविते, स्वप्निं सुखविते
लहरीपण, शिकवीते, निर्भयतेते
 —ही नूतन बाला !

लावितसे ओढ जिवा, नाहिं विसावा
दावीत जणूं मार्ग नवा, न कळे कावा
 —ही नूतन बाला !

ही काय रती ? –आसक्ती ? ना हिज भीती ?
कीं ही प्रकृती ? –नाहि गडे, 'यौवन-प्रीती' !
 —ही नूतन बाला ॥

—सौ. सुशीला मराठे.

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

तुझे डोळे

★

तुझे डोळे सखे निळे । द्राक्षवल्लींचे मळे ।
अन् नेत्र-नीरांजनीं । ज्योति प्रीतीची पाजळे ॥१॥
गमे रम्या पुष्करिणी । भाव-रत्नांची कीं खाणी ।
अभ्यन्तरीं डोकावतां । कळे प्रीतीची गाढता ॥२॥
तुझी नजर गहिरी । जणु सोनियाची सुरी ।
अन्तरांत मखमली । करी जखम जहरी ॥३॥
तुझी दृष्टी, शरासन । करी बाणांचें वर्षण ।
भाता अक्षय्य प्रीतीचा । चाले युगनुयुगाचा ॥४॥
तुझ्या डोळ्यांच्या पापण्या । छे नव्हे, अत्तरदाण्या ।
आंत प्रीतीचा सौरभ । जिंकी कठोर वल्लभ ॥५॥
तुझ्या डोळ्यांचे कोंपरे । प्रणयाचे कीं मनोरे ।
ताजमहालीं डोळ्यांच्या । उभे करीत पहारे ॥६॥
तुझ्या लोचन-क्षितिजीं । शत-तारकांची दाटी ।
होई क्षणोक्षणीं जिथे । प्रेम-भावाची कीं भेटी ॥७॥

—वि. गो. रुक्मांगद.

निवेदन

★

अंतरांत माझ्या । अंधारलें पाही
कोणत्या उपायीं । लावूं दीप ॥
हुरहूर कैसी । पोखरीत जीवा
क्षण न विसावा । मना मिळे ॥
प्रपंचीं कष्टला । देह हा सदाची
तृषा ती मनाची । शमेनाच ॥
कोण्या ठायिं जाऊं । कोठें कैसें राहूं
मनास शांतवूं । कोणे रीती ॥
अधिष्ठान देवा । तुझें कुठें गेलें ?
कैसें जग झालें । विपरीत ॥
सज्जन चालीचें । दुर्जन दीसती
दुर्जना वानीती । थोर लोक ॥
दूध पीति तेथें । ओकिती गरळ
वर्तन सरळ । नाही त्यांचें ॥
ऐशा दंगलींत । भांबावूनि जातों
तूज आठवितो । मायबापा ॥

—सौ. प्रभावती केसकर.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रंथ समीक्षा

मनाचे संकल्प*

श्री. म. ना. अदवंतांचा 'मनाचे संकल्प' हा लघुनिबंधांचा संग्रह आहे. लघुनिबंधांत जे गुण असावे अशी टीकाकारांची अपेक्षा असते ते सगळे गुण त्यांच्या अनेक निबंधांमध्यें आहेत. निबंधाचे विषय, सर्वसाधारण माणसाच्या जीवनांत घडणाऱ्या प्रसंगांमधून त्यांनी टिपले आहेत. त्या विषयाशीं खेळता खेळता, प्रसंगाच्या अनुरोधाने स्वतःचे अनुभव जागृत करताकरता त्यांच्या निबंधाची उभारणी होते. उभारणी करतांना मित्र त्यांच्या डोळ्यासमोर असतात, जणूं काय त्यांनाच उद्देशून ते लिहिताहेत. साहजिकच वाचक आणि लेखक यांच्यांत सहानुभूति चटकन् निर्माण होते. निबंधविषय जसा लेखकाच्या तसाच वाचकाऱ्याहि परिचयाचा असतो. विषय साधा असतो, त्यांतून प्रत्येक ठिकाणीं मोठा आशय अदवंत काढून दाखवतीलच अशांतला भाग नाहीं, पण त्या विषयाला परिपुष्ट करणारे अनेक अनुभव ते सांगतील. स्वतःच्या अपेशी कोटासंबंधीं सांगतांना ते स्वतःचे आणि इतरांचे अनुभव वर्णन करतील, आणि अपेशीपणा वस्तूच्या माथीं कां मारला जातो याचें विवरण करतील. 'पुराणांतील वांगीं पुराणांतच' ठेवणारांना तुम्ही आम्ही दोष देऊं; पण अदवंत त्याला दोष देणार नाहीत. पुराणांतलीं वांगीं पुराणांत ठेवणारा पुराणिक प्रामाणिकपणें कबूली तरी देतो पण आपण वांगीं पुराणांत ठेवून वर या प्रवृत्तीचें समर्थन करतों, ही गोष्ट त्यांना दूषणीय वाटते. सबबींना ते भिडस्त माणसाची ढाल म्हणतात. आणि या ढालीचा उपयोग भिडस्त माणसाला कसा होतो हें अनेक उदाहरणें देऊन पटवून देतात. भांडणें हीं त्यांना संसारांतील रम्य झरे वाटतात. मग रम्य झरे कसे हें दाखवण्याकरितां ते स्वतःचे घरगुती अनुभव सांगतील, त्याचप्रमाणें भोंवतालच्या जगांतील व्यक्तींच्या ठिकाणीं भांडणाबाबत ही वृत्ति नसल्यामुळे ते आनंदाला कसे मुकतात याचें दिग्दर्शन करतील.

कोणत्याहि निबंधाची मांडणी पाहिली तर प्रथम एखाद्या प्रसंगाचें अथवा अनुभवाचें रेखाटन नंतर तत्सम किंवा विरोधी प्रसंगांचें अथवा अनुभवांचें कथन हा प्रकार सर्व निबंधांमधून आढळून येतो. निबंधांत अनुभव इतके सांगितलेले असतात कीं जणूं काय, निबंध लिहिण्याअगोदरच त्यांनी अनुभवांची, प्रसंगांची एक जंत्रीच तयार केली आहे! परिणाम हा झाला आहे कीं पाल्हाळिकपणाचा दोष सगळ्याच निबंधांत आला आहे. 'प्रवासांतील सोबती' 'भिडस्त माणसाची ढाल' यासारख्या सुंदर विषयांवरील निबंधांचेंहि मोल कमी झालें आहे. निबंधवस्तूंची त्यांची निवड मार्मिक आहे. पण तिची खुलावट मात्र हृद्य नाही. निबंधांत रमणीयता निर्माण करायचें, ती वृद्धिंगत करायचें एकच साधन जणूं काय त्यांना उपलब्ध आहे, आणि तें म्हणजे प्रथमपुरुषी 'मी'च्या अनुभवांचें कथन. परिणाम असा होतो कीं दोनतीन परिच्छेद वाचल्यांबरोबर निबंधाची गति खुंटते, निबंध अवघडल्यागत होतो. सांगायचें तें सगळं सांगून झाल्यासारखें होतें. वाचकाच्या मनाला आंदोलनें देतदेत, हेत्वाभास निर्माण करीत; एखाद्या अबोधपूर्व अशा विषयाची, विचाराची जाणीव करून देत, विषयाच्या वाहत चाललेल्या ओघाला विस्मयकारक कलाटणी

*ले. प्रा. म. ना. अदवंत. प्रकाशक—स्कूल व कॉलेज बुकस्टॉल, कोल्हापूर, किं. २-८-०.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

११९२२
ऑगष्ट

देऊन मधूनच काव्य, सौंदर्य यांचें दर्शन घडवत, साहित्यांतील साम्यस्थळांची स्मृति करून देत निबंधकार आपला निबंध सुंदर आणि समृद्ध करत असतो. अदवंतांच्या निबंधांमध्यें या गोष्टी नाहीत असें नाही. पण त्या इतक्या तुरळक आहेत कीं निबंधाच्या सौंदर्यांत त्या विशेष भर घालतात असें म्हणता येणार नाही. निबंधाची कलाकुसर त्यांना चांगली अवगत आहे. पण निबंधांत जीव भरून वाचकाला निबंधाच्या ओघाबरोबर ओढून न्यायचें सामर्थ्य या निबंधसंग्रहांत अत्यंत परिमित स्वरूपांत आढळून येतें. कित्येकदां तर निबंधाचा सूर ते घालवून टाकतात. ‘ जगावेगळें ’ जें आहे त्याची तरफदारी करत असतांना आज जें जगावेगळें आहे तें उद्यां जगाचें होतें हा विचार निबंधांत आला, आणि त्यामुळे मूळच्या विचाराचें सौंदर्य आणि सामर्थ्य लोपलें. अशींच आणखी एकदोन स्थळं प्रस्तावनाकारांनी प्रस्तावनेंत उल्लेखिलीं आहेत.

अर्थात् हें सगळें लेखकाच्या दृष्टीने, वाचकाच्या दृष्टीने नव्हे. निबंध सर्व-सामान्यपणे वाचनीय आहेत. स्वतःचे आणि लेखकाचे अनुभव ताडून पाहण्यांत त्याला आनंद वाटेल आणि सगळ्यांचेच अनुभव सारखे असें वाटून त्याला दिलासाच मिळेल. पण अदवंतांच्या निबंधांत जास्त रंगत आली-आणि ती ते खातरीने आणूं शकतात—तर श्री. खांडेकरांनी त्यांच्या बाबतींत प्रगट केलेली आशा (लघुनिबंधाच्या क्षेत्रांत बहर यावा आणि त्याला अदवंतांचा हातभार लागावा) सफल व्हायला कोणताच प्रत्यवाय उरायचा नाही.

—गो. रा. दोडके.

★

श्रुतिगुण–नाटिका*

श्री. शं. ब. तळेकर यांनी श्रुतिका उर्फ नभोनाट्य (Radio play) या लेखनप्रकाराचें तंत्र विशद करणारा हा ग्रंथ लिहिलेला आहे. मराठींत नभोवाणी-विषयक वाङ्मय अल्प आहे आणि त्या दृष्टीने श्री० तळेकरांच्या या ग्रंथाचें महत्व अनन्यसाधारण आहे. कर्त्याने नभोनाट्यविषयक पाश्चात्य वाङ्मयाचें परिशीलन करून व या लेखनप्रकाराचें तंत्र बारकाईने अभ्यासून हा ग्रंथ लिहिलेला आहे. नागपूर येथे १९४८ सालीं या प्रांतासाठीं नभोवाणी केंद्र स्थापन झाल्यापासून या प्रांतातील उदयोन्मुख तरुण लेखकांना नभोनाटिकांचें नवें दालन खुलें झालें आहे. आणि या लेखन प्रकाराचें रहस्य समजून घ्यावयाचें असल्यास त्यांनी श्री. तळेकरांच्या या ग्रंथांचा अभ्यास केला पाहिजे. हा ग्रंथ नभोवाणी लेखकांनी तर मुळांतून वाचावा अशी आमची अपेक्षा आहे. या ग्रंथांत कांही श्रुतिकांचा समावेश केलेला आहे. या श्रुतिकांपेक्षां मुंबईकेंद्रावरून ध्वनिक्षेपित झालेल्या कांही निवडक गाजलेल्या श्रुतिकांचा अंतर्भाव केला असता तर पुस्तकाचें मोल अधिक वाढलें असतें, तसेंच Opera उर्फ संगीतिका या विषयीं विवेचन केलें असतें तर या ग्रंथाचें महत्व अधिक वाढलें असतें. पुढील आवृत्तींत श्री० तळेकर, वरील सूचना लक्षांत घेऊन कांही उत्कृष्ट मराठी श्रुतिकांचा ग्रंथांत समावेश करतील व संगीतिकेच्या तंत्राचें विवेचन करतील अशी आशा आहे.

—पां. ब.

---

* लेखक शं. ब. तळेकर; प्रकाशक—गोडबोले आणि गोडबोले, २६५, बुधवार. पुणें–किं. २ रु.

११९७

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

देमांद माहात्म्य*

(प्रथम-कांड)

देमांद माहात्म्य हें वीस अध्यायांचें व सव्वादोनहजार ओव्यांचें एक विडंबन-काव्य आहे. तीस वर्षांपूर्वी यांतील अध्याय ' स्वयंसेवक ' मासिकांतून खंडशः प्रकाशित झाले होते. आज ते पुस्तक रूपाने प्रसिद्ध होत आहेत.

देमांद म्हणजे कोर्टबाजी अथवा कज्जेदलाली. अनेकांना कोर्टबाजीचें जणू व्यसन असतें. क्षुल्लक कारणासाठी कोर्टाची पायरी चढून खोट्या अभिमानापायीं सर्व संपत्तीची राखरांगोळी करून घेतल्याचीं उदाहरणें सर्वच समाजांत पुष्कळ पहावयास सापडतात. गोमंतकांतहि एकेकाळीं ' देमांद ' हें प्रतिष्ठित व्यसन होतें. या व्यसनापायीं भिकेला लागलेल्या अनेक लोकांच्या करुण कहाण्या (अर्थात् कल्पित) यांत आलेल्या आहेत. समाजांतील दुष्ट चालींवर टीका करतांना ' विडम्बन ' या हत्याराचा चांगला उपयोग होतो. हें जाणून कवीने ' देमांद हें भूषण नसून दूषण आहे हें कठोर पण हंसविणाऱ्या शब्दांनी, बोलक्या पण गुदगुल्या करणाऱ्या भाषेने ' या काव्यांतून सांगितलें आहे.

' शनि-महात्म्या ' सारखें एखादें ' माहात्म्य ' जसें आणि ज्या पद्धतीने सांगावें तसें आणि त्या पद्धतीने हें ' देमांद-माहात्म्य ' सांगितलें आहे. अध्यायवार रचना, ओवीछंद हीं बाह्यांगें अशा वर्णनाला अनुरूपच होत. कोर्टविषयक शब्द पोर्तुगीज भाषेतील वापरले आहेत. त्याचीहि विडम्बनाला मदतच झाली आहे. अध्यायाच्या प्रारंभीं व शेवटीं देमांदाचें आलेलें स्तवन उत्कृष्ट उपरोधपर असून श्रीधर कवीचें अनुकरण स्पष्ट दिसतें. रचना सफाईची व भाषा ओघवती आहे. काव्य व विनोद दोन्ही दृष्टींनी सरस उदाहरणें अनेक देतां येतील. कवीचें कथावर्णन-कौशल्यहि चांगलें प्रत्ययाला येतें. प्रत्येक कथेंत देमांदाचें कारण निराळें असल्यामुळे वैचित्र्य निर्माण झालें आहे. मधून मधून कोर्टबाजीच्या दुष्परिणामासंबंधीं जीं व्याख्यानें कवीने दिलीं आहेत तीं यथार्थ असलीं तरी काव्याच्या विडम्बनात्मक स्वरूपाला त्यामुळे बाधा येते.

एका दुष्ट व्यसनाला सुंदर रीतीने उजेडांत आणण्याचें कार्य या काव्याने केलें आहे. त्याबद्दल व विडम्बन-काव्याच्या दालनांत उत्कृष्ट भर घातल्याबद्दल श्री. वि. का. प्रियोळकर धन्यवादास पात्र आहेत.

—श्री. मा. कुलकर्णी.

---

*कवि व प्रकाशक श्री. वि. का. प्रियोळकर अे. २२, सारस्वत कॉलनी, शीतलादेवी टेंपल रोड, माहीम, मुंबई. प्रथमावृत्ति, जुलै १९५१. मूल्य ४ रुपये.]

अनुक्रमणिका
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भूकबळी*

'भूकबळी' हा श्री. सुरेश शर्मा यांच्या हृदयस्पर्शी लघुकथांचा छोटासा संग्रह आहे. त्यांतील सर्वच कथांचा विषय 'बंगालचे भूकबळी' एवढा एकच असला तरी लेखकाच्या रचनाकौशल्यामुळे त्यांत वाचकांच्या मनाची पकड घेण्याचें सामर्थ्य आलेलें आहे. 'पिवळे गुलाब' आणि 'माणसाचें मांस' या दोन कथा लेखकाच्या स्वतंत्र कल्पकतेची आणि रचना कौशल्याची साक्ष देतात. 'मुलीचें मोल' या कथेंत पोटासाठी पोटची पोर अधेलीच्या मोबदल्यांत पठाणाला विकणाऱ्या मातेचें चित्र रेखाटलेलें आहे. भुकेला बळी पडलेल्या पतीच्या दहनापुरता पैसा मिळविण्याकरितां अब्रूचें मोल देणारी 'बेला' व पोटच्या पोरीचें तरुण शरीर झाकण्याकरितां दफनावरील कपडा चोरणारा नी त्याचवेळी पकडला जाणारा 'करीम' यांचीं चित्रेंहि हृदय पिळवटून टाकतात. 'हॉस्पिटलांतील हालहवाल' आणि 'पाजीपणाची परमावधि' यांतील, परतंत्र भारतांतील उन्मत्त व बेजबाबदार सरकारी अधिकाऱ्यांचें वर्तन कोणाच्याहि मनांत संताप उत्पन्न करील. लेखकाच्या हृदयांतील तळमळीचा अकृत्रिम आणि उत्कृष्ट आविष्कार 'भूकबळी' या कथासंग्रहांत झाला आहे.

—मा. गो. जामदार.

हासलीस एकदां !

★

हासलीस एकदां—
हासूं तव मज हसवी परि सखे सदा ! ॥धृ॥
मधुर खळी गालींची—
मनिं उठवी सुख-वीची
दिधली पांथास दिव्य सौख्य संपदा !—
उर होतां क्षण उघडे—
आवरले त्यांस गडे—
आवळले परि माझें चित्तहि तदा !—
चोरुनिया माझें मन
हास्यरसें देशि भरुन
कुठला या गोड लबाडीस कायदा !—
स्मरतां तें हास्य गडे
सहज जिवा भूल पडे
जनिं, विजनीं मी आतां हसत सर्वदा !—
होउन तूझा गुलाम
तिष्ठत तेथें सकाम
सांग, अशिच भेटशील हसत तूं कदा !—

—प्रभाकर रं. देव.

---

* ले.—सुरेश शर्मा, सुरस ग्रंथमाला, पंढरपूर किं. २ रु.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

श्री चैतन्यप्रभूंची महाराष्ट्रांतील तीर्थयात्रा

बा. ना. सहस्रबुद्धे

युगवाणीच्या जुलै अंकांत श्री. अण्णासाहेब खापर्डे यांनी " श्री तुकारामांची गुरुपरंपरा " या लेखांत ही परंपरा राघव चैतन्य, केशव चैतन्य व बाबाजी चैतन्य ही धरली आहे. पण प्रत्येकाच्या नांवापुढे चैतन्य ही उपाधी लागण्याचें एक कारण बंगालकडील वैष्णव पंथाचे प्रवर्तक चैतन्य प्रभु हे दक्षिणयात्रेंत हिंडताना महाराष्ट्रांत कोल्हापूर पंढरपूरकडे आले असतां वरील गुरूंपैकी (बहुतेक) राघवांची गाठभेट होऊन चैतन्यांनी अनुग्रह केल्याने चैतन्य ही उपाधी गुरुपरंपरेत सुरू झाली असावी असें त्यांचें म्हणणे आहे. परंतु तुकारामांच्या गुरुपरंपरेत चैतन्य ही उपाधी ओतूरच्या चैतन्य गुरूंच्यामुळे आली असें प्रा. दांडेकरांच्या सारख्या विद्वानांचें म्हणणें आहे. शिवाय श्री तुकारामांनी प्रत्यक्षगुरूपदेश कोण्या व्यक्तीकडून घेतला नसून " धर्मप्रवृत्तीच्या निदिध्यासाने " स्वप्नांत बाबाजी चैतन्यांचा उपदेश झाला असें त्यांच्या चरित्रांत आहे.

बरें, श्री. आण्णासाहेबांनी ज्या श्रीकृष्णदासाच्या " श्री चैतन्यचरितामृतम् " या काव्य-ग्रंथांतून चैतन्यांच्या महाराष्ट्रांतील यात्रेचें वर्णन दिलें—तें तेवढेंच असेल तर—तें इतकें त्रोटक आहे कीं, तेवढ्यावरून गुरुचैतन्य भेट होऊन अनुग्रह होऊन चैतन्य उपाधी नांवापुढें लागली असें म्हणता येणार नाही. श्रीकृष्णदासांपेक्षां चैतन्यांच्या महाराष्ट्रांतील यात्रेची कितीतरी विस्तृत हकीगत चैतन्यांचा खास शिष्य गोविंददास याने आपल्या " गोविंददासेर कडचा " या बंगाली काव्यग्रंथांत दिली आहे. पण त्यांत कोणावर अनुग्रह केल्याचें दिलें नाही.

चैतन्य प्रभु दक्षिणयात्रेस सन १५११ त निघाले. ते ओढिसा मार्गानें दक्षिणेंत गेले, ओढिसांतील तत्कालीन एक प्रसिद्ध धर्मक्षेत्र जाजपूर, येथे दशाश्वमेधघाट ओलांडून वैतरणी नदीपलीकडे एक मोठें वराह मंदिर आहे. तेथे चैतन्यांच्या पादुका बसविल्या आहेत, तेथे पुढील लेख इंग्रजींत खोदला आहे. "Mahaprabhoo Visited Jajpur in 1511 A. D. Chaitany Foot Print installed by Param Harsh Bhakti Sidhant Saraswati Goswami in 1930." श्री. अण्णासाहेबांनी श्रीकृष्णदासाचा काल १५१७–१६१७ दिला आहे. त्यावरून श्रीकृष्णदासाचा जन्महि झाला नव्हता त्या पूर्वीच चैतन्य यात्रेहून परतहि गेले असतील, यावरून श्रीकृष्णदासाने दिलेली माहिती ही ऐकीव ठरते. पण गोविंद यांनी आपल्या "कडच्यांत" दिलेली माहिती ही प्रत्यक्ष पाहिलेली "चक्षुर्वै सत्यं" होती. यांनी गोविंददास हा चैतन्यांच्या बरोबर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

यात्रेत हिंडत होता. त्याने चैतन्यांच्या महाराष्ट्रांतील यात्रेचें जें सविस्तर वर्णन केलें आहे तें कलकत्त्याचे डॉ. देवदत्त रामकृष्ण भांडारकर एम्. ए., पी. एच्. डी. यांनी १९३० च्या "बृहन्महाराष्ट्र वार्षिक" अंकांत "श्री चैतन्यांची पुणे जिल्ह्यां-तील तीर्थयात्रा" या मथळ्याखाली दिलें आहे. अर्थात् ही गोष्ट खरी की, या वार्षिकाचा प्रसार सार्वत्रिक नसल्याने त्यातील महत्वाचे लेख सर्वांच्या वाचनांत येणें शक्य नव्हतें. चैतन्यस्वामी कोल्हापूर पंढरपूरकडेच नव्हे तर पुण्यास राहिले होते. भोळेश्वर, देवळेश्वर, जेजुरी, चोराची आळंदी, खंडाळा, नाशीक वरून ते गुजराथ काठियावाडांत सोमनाथकडे गेले. डा. भांडारकरांच्या त्या लेखांतील महत्वाचा भाग येथे दिल्यास अस्थानी न होता उपयोगी पडेल व गोविंददासाने प्रत्यक्ष पाहून दिलेली माहिती किती महत्वाची होती तें दिसेल म्हणून ती देतों.

चैतन्यांची महाराष्ट्रांतील यात्रा

मद्रासकडील तीर्थाटन संपवून चैतन्य विजापूरचे डोंगर ओलांडून हरगौरीच्या मुक्कामास आले. मलयागिरी, महेन्द्रगिरी पाहिली पण सह्यगिरीची शोभा त्यास नाही असे उद्गार स्वामींनी काढले. तेथून ते पुण्यास आले. पुण्याचें नांव पूर्णनगर असें दिलें आहे. पुण्याच्या लगत "अच्छसर" नावाचें सरोवर (तलाव) होतें. तेथे एक प्रचंड बकुळ वृक्ष होता. तेथे चैतन्य राहिले होते (हा पर्वतीचा तलाव असावा). पुण्यास त्या काळीं—श्री शिवाजी महाराजांच्या जन्मापूर्वी १०० वर्षे- विद्वान ब्राह्मणांची वस्ती होती; संस्कृत पाठशाळा होत्या, भागवत व भगवद्गीतेचे पाठ सर्वत्र चालत, चैतन्य स्वामी असे भागवत पुराण ऐकून तल्लीन होऊन जात. चैतन्य स्वामींना भक्तीचे झटके येत त्यांत ते बेहोष होऊन जात. "कृष्णा तूं आहेस कोठे, मला तूं का दिसत नाहीस" असें मोठ्याने टाहो फोडून म्हणत. एकदा ते अच्छसर तलावाजवळच बसून असाच टाहो फोडीत असतां, "तुझा कृष्ण या सरोवरांत आहे" असें एका वात्रट माणसाने म्हटल्याबरोबर स्वामींनी त्या सरोवरांत (तलावांत) उडी टाकली! तेथे पुष्कळ लोक होते, त्यांनी चैतन्यांना बाहेर काढलें. ते लोक त्या वात्रट मनुष्यास शिव्या देऊं लागले तेव्हा स्वामींनी त्यांना थांबवून समजावलें की, त्या गृहस्थाने खोटें मुळींच सांगितलें नाही कारण कृष्ण हा सर्वत्र भरला आहे. चैतन्यांनी त्या सर्वांना हरिनामाचा उपदेश केला.

स्वामी पुण्याहून भिमथडी तालुक्यांतील पाटस गावीं गेले. तेथून भोळेश्वरास गेले. श्रावण मासांतील मोठी जत्रा तेथे भरली होती. तेथे "सिद्धकूप" नांवाचा तीर्थ कुवा (विहीर) होता. तेथून स्वामी जवळच्या डोंगरमाथ्यावरील देवळे-श्वराच्या दर्शनास गेले. तेथून ते जेजूरीस खंडोबाच्या दर्शनास गेले. तेथील मुरळ्यांची हकीकत ऐकून स्वामींना अत्यंत वाईट वाटलें. ते स्वतः मुरळ्यांच्या वस्तींत गेले व त्या मुरळ्यांना हरिनामाचा उपदेश केला. "गोपींनी कात्यायन व्रत आचरून कृष्णाला पति मानला त्याप्रमाणे कृष्णास तुम्ही पति माना व त्याचे नांवाचा जयघोष करून जप करा. खंडोबास पति करू नका" असा उपदेश केला. त्या मुरळ्यांपैकी इंदिराबाई नांवाच्या म्हाताऱ्या मुरळीला उपरती होऊन तिने संसारत्याग केला! तेथून चैतन्य चोराच्या आळंदीस गेले. त्या काळींहि आळंदीच्या चोरांची ख्याती होती. जेजूरीच्या लोकांनी चोराच्या आळंदीस जाऊं नका असें सांगितलें असताहि ते मुद्दाम तेथे गेले व जंगलांतील चोरांच्या अड्ड्याच्या झाडाखालींच उतरले. "या दस्युगणांवर हरिनामाचा मी वर्षाव करीन" असें ते म्हणाले. चोरांनी त्यांना घेरलें पण स्वामी बोलूं

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लागल्यावर ते मुग्ध बनले. त्यांचा नायक नारोजी नावाचा ६० वर्षांचा ब्राह्मण होता तो आला, त्याने स्वामींना आपल्या घरीं भोजनास बोलावलें पण स्वामींनी नकार दिल्यामुळे त्याने शिधा सामुग्री तेथे आणून सुग्रास अन्नाचा स्वंयपाक केला,. त्यांतील उत्तम खाद्यपदार्थांचे ढीग पाहून स्वामींचा शिष्य गोविंददास म्हणाला, आम्ही इतके देश हिंडलो पण कोणत्याहि देशांत असें खाद्य आम्हांस दिसलें नाही. तें अन्न पाहून चैतन्य उठले व हरिनामाचा गजर करीत नाचत नाचत त्या अन्नावर जाऊन त्यांनी तें सर्व अन्न नासाडून टाकलें तें सुग्रास अन्न खाण्यास मिळालें नाही म्हणून गोविंददासास वाईट वाटलें पण चोरांचा नायक नारोजी यास कृतकर्मांचा पश्चात्ताप होऊन त्यानें आपलें शस्त्र फेकलें. घरदार सोडून कौपीन घालून तो स्वामींच्या बरोबर यात्रेंत मिसळला. स्वामी तेथून खंडाळ्यास गेले. तेथून नाशीकची यात्रा करून गुजरायेंत शिरून भडोच बडोद्यावरून काठेवाडांत सोमनाथाकडे गेले. ते ठिकठिकाणीं जनतेला हरिनामाचा उपदेश करीत. स्वामींच्या प्रभावामुळे कांही वाममार्गी लोकांना उपरति झाल्याची उदाहरणें या यात्रेंत आहेत. डॉ० भांडारकरांनी दिलेली माहिती ही पुणें जिल्ह्यांतील आहे. गोविंददासाच्या मूळ "कडच्यात" महाराष्ट्रांतील इतर ठिकाणचीहि माहिती असली पाहिजे.

वरील माहिती दिल्यावार डॉ० भांडारकरांनी एक शंका प्रगट केली, ती अशी की, चैतन्य स्वामी वैष्णव व भागवत पंथाचे कट्टे अभिमानी असतांना पुण्यास येऊन जवळच्या ज्ञानेश्वराच्या आळंदीस गेल्याचा उल्लेख "गोविंददासेर कडच्या" यांत नाही. याच्या उलट ते भोळेश्वर, देवळेश्वर खंडोबाचे दर्शनास जातात! हीं स्थानें वैष्णव पंथी कधीच नव्हतीं. तेव्हा चैतन्याच्या वेळी आळंदी वैष्णव तीर्थ बनून प्रसिद्धिस आली होती कां नव्हती!

चैतन्य स्वामींच्या वर दिलेल्या हकीगतीवरून एक गोष्ट स्पष्ट दिसते की स्वामींचा उद्देश केवळ देशपर्यटन व यात्रेचा होता. गावोंगावीं ते हरिनामाचा स्वतः गजर करीत व जनतेकडून करवून त्यांना भक्तिमार्गास लावण्याचा उद्योग यदृच्छेने करीत होते, पण यावरून सांप्रदायिक गुरूपदेश अगर अनुग्रह करून, मठ व शिष्य-शाखा, स्थापन करण्याचा उद्देश दिसत नाही. गोविंददासाने वरील बारीक सारीक गोष्टीहि दिल्या त्या प्रमाणे गुरुपदेश अगर अनुग्रह जर कोणावर केला असता तर त्यांचाहि उल्लेख त्याने सहज केला असता; पण तो वरील हकीगतीत नाही. तेव्हा अशा प्रकारचा काही पुरावा सापडल्याशिवाय श्री तुकाराम महाराजांच्या गुरु-परंपरेतील गुरूंच्या नांवापुढील "चैतन्य" उपाधीस चैतन्य स्वामींच्या यात्रेंतील काल्पनिक भेटीचें कारण लावणें योग्य दिसत नाही.

बंगाल, ओरिसा, मथुरा वृंदावन या भागांत श्री चैतन्यांच्या वैष्णवपंथाचा प्रसार व शिष्यशाखा अद्यापहि आहेत. स्वामींच्या चरित्रावर कृष्णदासाचें "श्री चैतन्य चरित्र" किंवा "गोविंददासेर कडच्या" येवढेच ग्रंथ नसून बंगालींत व इंग्रजींतहि वाङ्मयभांडार आहे. अमृत बाझारचे आद्य संस्थापक कै. शिशिरकुमार घोष यांनी इंग्रजींत "Lord Gaurang" व बंगालींत "श्री अमिओ निमाई चरित्र" असे प्रचंड ग्रंथ लिहिले आहेत. ते निरनिराळ्या तत्कालीन हस्तलिखित ग्रंथाधारें व कागदपत्राधारें लिहिले असले पाहिजेत. चैतन्यांची वरील महाराष्ट्रांतील यात्रेची हकीगत "Lord Gaurang" Vol. II Page 342, 343 व बंगालींत श्री अमिओ निमाई चरित्राचा भाग ६ पान ११४, ११५ यावर आहे.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भैय्या तो चले गये—!

मधुकर मंगरूळकर

✶

गेल्या वर्षीच्या मे महिन्यांतली गोष्ट. मी बनारसच्या स्टेशनवर उतरलों, तो मनांत अनेक आकांक्षा बाळगूनच. शक्य तो नव्या कलावंतांच्या ओळखी करुन घ्यायच्या आणि जुन्या उजळायच्या. स्टेशनवरच्या तसल्या धमाल गर्दीत सामान नेणाऱ्या हमालाकडे लक्ष ठेवतां ठेवतां कुठे खाँ साहेब बिसमिल्ला शहनाईवाले सहज झळकतात काय हेंहि बघत होतों.

रस्त्यांतून रिक्षा करून निवासस्थानीं पोंचेतोंवर परणू जात असलेले वर किंवा तेलवाणाला निघाल्या असलेल्या वधु यांच्या मिरवणुकी दिसल्या आणि बिसमिल्ला-सारख्यांच्या साहचर्यानें तिथल्या वाजंत्र्यांच्या वादनावर विशेष परिणाम झालेला दिसला. बिसमिल्लांच्या अनेक प्रसिद्ध कजऱ्या त्यांच्या मुखांतून स्रवत होत्या. गंगानदीचें गंभीर विशालत्व त्यांत नसलें तरी, तिच्या उगमाची शुचिता खासच होती.

सायंकाळीं मी कलावंताच्या निवासस्थानांची चौकशी केली. त्या मोहल्याच्या नांवातहि मला वैशिष्ठ्य आणि रसिकता दिसली. नांव होतें 'दालमंडी'. 'डाल मुंडी' या हिंदी शब्दप्रयोगाचें तें अपभ्रष्ट स्वरूप असावें असें मला क्षणभर वाटलें. या मोहोल्यांत मुंडी घालून तर बघ, असेंच जणूं तो शब्द सुचवीत होता. तिथली आरास जरा विचित्रच होती. रस्ता फारतर पांच किंवा सहाफूट रुंद असेल. खालच्या मजल्यावर सुप्रसिद्ध बनारसी सिल्कचीं दुकानें दाटीवाटीनें बसलीं होती. हजारो लाखोंचा व्यवहार होत होता आणि वरच्याच मजल्यावर रेशमी कायेचा व्यापार. पानाच्या ठेल्यावर लटकविलेल्या असाव्या त्याप्रमाणे प्रत्येक खिडकींत विशिष्ट लकबींत अटकविलेल्या त्या जिवंत तसबिरी—

एकानें मला हळूंच हटकलें, 'क्यों! राजाबाबू! कुछ गाना वगैरा सुनना चाहते हो-'

'जी नहीं, मगर बिसमिल्ला खाँसाहाबका मकान अगर आपको मालूम हो तो—'

'जी'—असें म्हणून तो पुढे झाला. त्याच्या मागोमाग आमची स्वारी चालली. माझ्या भेटीचा आशय त्यानें विचारायचा प्रयत्न केला. प्रसिद्ध सारंगिये गोपाल मिश्र आपल्या ओळखीचे आहेत आणि रेशम नांवाची छोकरी—! मी त्याला सरळ सरळ घर विचारलें तेव्हा तो नाराज होऊन म्हणाला,

"निकालो पता! हमें काहेको पूछते हैं"

आणि सुदैव असें कीं मी उभा होतों त्या समोरचीच मोठी हवेली खाँ साहेबांची होती. मीं चौकशी केली. एका छोट्या छोकऱ्यानें सांगितलें 'बाहर गये हैं—!' मी नागपूरहून मुद्दाम भेटायला आलों हें कळतांच त्यानें मला आंतल्या खोलींत नेलें. तो पोरगा मोठा चुणचुणीत होता. मी त्याला खाँ साहेबांचें त्याचें नातें विचारलें.

'वे मेरे चचा होते हैं–'

'मग काय सनई शिकतोस की नाही–'

'जी, सबेरे रोजाना चार घंटे–'

मला आश्चर्य वाटलें. या वयांत रोज चार घंटे मेहनत. वयाचीं आठ वर्षेंहि पूर्ण झालीं नव्हतीं. "और तुम्हारे पिताजी शमसुद्दिन भैय्या कहाँ हैं?" माझा प्रश्न

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ऐकून त्याचा चेहरा खर्रकन उतरला. स्वच्छ निळ्या आकाशांत एकाएकी ढगांनी गर्दी करावी तसें झालें. खाँसाहेबांच्या जलशांत त्यांच्या बरोबरीने खर्जांत काम करणाऱ्या त्यांच्या बंधुराजांविषयीं चौकशी करण्यांत माझें तर कांही चुकलें नव्हतें. तितक्यांत तो रुद्ध कंठाने म्हणाला—

"वे अब नहीं हैं। आज उनकी तेरवी है"

तें उत्तर इतकें अनपेक्षित होतें की त्या ठिकाणी एक क्षणभरहि मला बसवेना. इतक्यांत, एका लहान मुलाने खाँ साहेब येत असल्याची वर्दी दिली. त्यांनी मला पाहताच माझे दोन्ही हात आपल्या हातात धरून म्हटलें, 'बहोत आनंद हुआ. कैसे आना हुवा इतने दूर–'

मी माझ्या हातांतला गेल्यावर्षीचा 'सत्यकथे'चा वर्षारंभ अंक त्यांच्यापुढे दिला आणि त्यांच्यावर लिहिलेल्या लेखाची प्रत स्वतः द्यावी म्हणून आल्याचें त्यांना सांगितलें. त्यांना खूप आनंद झाला. त्यांनी तो अंक जवळ जवळ हिसकावूनच घेतला. मराठी लिपी न समजतांहि जणू तो लेख शोधून काढण्यासाठी भराभर पानें परतविलीं आणि लेखांच्या अग्रभागीं घातलेल्या फोटोकडे नजर लावली. इतका वेळ अडलेल्या धरणाचा जणू बांधच निघाला! त्यांच्या काजळाने काळ्या झालेल्या डोळ्यांतून आंसवें ओघळूं लागली. आपल्या भावाच्या छबीकडे पहाताच त्यांचें चित्त हेलावलें.

"आज तेरा दिवस झाले. विषमाने ते वारले. मी माझ्या प्रयत्नाची शिकस्त केली. पण –मालिक की मर्जी !!" त्यांनी हळूच उठून बंद असलेलें दार किलकिलें केलें. आंतून वेदमंत्रासारखा घोष ऐकूं येत होता. तेरव्या दिवशीचे धार्मिक संस्कार आंत चालू असल्याचें त्यांनी सांगितलें. मी मात्र भलत्या वेळीं आल्याबद्दल त्यांची क्षमा मागितली. ते म्हणाले:—

"जी नहीं–मेरा तो बडा भाग है, आप जैसे लोग! मी तुमच्या लेखाचा तर्जुमा करवून घेईन अन् वाचीन. मगर.....भैय्या तो चले गये. अब वह मजा गया. दिल चाहता है की सब छोड देना......मगर—' त्यांनी आपल्या छोट्या पुतण्याला पोटाशीं घेऊन थोपटलें व म्हटलें:—

"रोना मत रे, बाबू साहब नहीं हैं मानता हूँ। खताकी नजरसे तेरा नुकसान कम है क्योंकि मैं हूँ, लेकिन मेरा––"

क्षणभरांत विचलता आवरून ते म्हणाले––"अच्छा, बच्चा, कलका उनका टप्पा तो सुना दो ज़रा भाई साहब को"

अमावस्येच्या रात्रीं चंद्रज्योतीचें कारंजें उडावें तशा दाणेदार तानांचा एक टप्पा त्या छोकऱ्याने म्हणून दाखविला. त्या दुःखद वातावरणाला एक नवा उजाळा आला. त्याच्या त्या स्वच्छ फिरतीने त्यांनाहि नवा हुरूप आला व ते म्हणाले,

"'जावो बेटा मघई ले आवो' मै आपकी कुछ खातिर कर नहीं सका; अफसोस है।"

मी तिथून परत आलें तरी त्यांचे ते उद्‌गार माझ्या कानावर होतेच. ती जखम अजून ताजी आहे. परवा दिल्ली रेडिओवरून झालेला त्यांचा ७५ मिनिटांचा कार्यक्रम ऐकला. केदार तर तयारीत वाजला पण कजरी सुरू झाली आणि जणू त्या आर्त ओळींतून मला क्षणोक्षणीं प्रतीत होत होतें–– "भय्या तो चले गये––वह मज़ा गया"—

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

'युगवाणी' च्या अभ्यासिकेंत—

[प्रस्तुत टिपण डॉ. वि. भि. कोलते यांनी परिश्रमपूर्वक तयार करुन दिलें असल्याबद्दल कृतज्ञतापूर्वक उल्लेख करीत आहे.

—संपादक]

प्राचीन गद्य

यादवकालीन महाराष्ट्राचें महानुभावीय दर्शन,
ले. डॉ. शं. गो. तुळपुळे नवभारत. जून ५१, जुलै ५१; एप्रिल ५२.

प्राचीन कवि व काव्य

महाराष्ट्रीय संतांची महाराष्ट्रास समन्वयाची देणगी,
ले. शं. वा. दांडेकर. नवभारत. जाने. ५२.

शाहिरी वाङ्मयाची मीमांसा, ले. अ. ग. फंदी. महाराष्ट्र. फेब्रु. ५२.

संताजी जगनाडे आणि तुकाराम, ले. कृ. ना वैरागी. महाराष्ट्र मार्च. ५२.

पांडुरंगाचें स्थलांतर आणि पुंडलिकाचें रूपांतर, ले. श्री. म. माटे. हंस. मार्च ५२.

मुंबईच्या लोकगीतें, ले. चिं. ग. कर्वे. प्रसाद. एप्रिल ५२.

संतवाङ्मयाची सामाजिक फलश्रुति,
(प्रा. सरदार) समालोचकः डॉ. य. गं. लेले. प्रसाद. मे. ५२.

संतवाङ्मयांतील अर्जदास्त रूपक, ले. चिं. ग. कर्वे. प्रसाद. मे. ५२.

बीडकर विठ्ठलाचें सीतास्वयंवर, ले. प्रा. पां. ना. कुळकर्णी, सह्याद्रि, मार्च ५२.

बीडकर विठ्ठलानें नागेशाचें काव्य पाहिलें होतें काय ?
ले. प्रा. द. सी. पंगु. व प्रा. मा. ना. कुळकर्णी, सह्याद्रि, एप्रिल ५२.

कवि रघुनाथ पंडित प्रधान, ले. गो. रा. राजोपाध्ये. सह्याद्रि, एप्रिल ५२.

राजोपाध्ये यांचा निष्कारण गडगडाट, ले. स. ल. कात्रे. सह्याद्रि, एप्रिल ५२.

नलदमयंती स्वयंवराचा कर्ता कोण ? ले. य. ग. फफे. सह्याद्रि एप्रिल ५२.

समर्थ कालीन वाङ्मयांतील राजकारण शब्दाचा अर्थ,
ले. ज. स. करंदीकर. सह्याद्रि, एप्रिल ५२.

अर्वाचीन कवि व काव्य

ज्ञानेश्वरीय परंपरेतील बी कवि. प्रा. ह. वि. शेणोलीकर. नवभारत, फेब्रु. ५२.

गडकरी अंतरंग आणि साधना, ले. ना. रा. शेंडे. मधुवन, जाने. ५२.

गोविंदाग्रजांची काव्यसृष्टि, ले. ना. ना. हूड. मधुवन, जाने. ५२.

आजचें काव्य, ले. वा. ना. देशपांडे. म. सा. पत्रिका. जाने–मार्च ५२.

स्फूर्तिनिनाद (काव्यविहारी); उन्मेष आणि उद्रेक [भ. श्री. पंडित.] अनुपमा [सोपानदेव चौधरी] समालोचकः य. दि. पेंढरकर. मनोहर. जाने. ५२.

गद्यकाव्य, ले. वा. ल. कुळकर्णी. हंस. मार्च ५२.

काव्याच्या शास्त्रीय अभ्यासांतील दिशा, ले. चिं. ग. कर्वे. प्रसाद. जाने. ५२.

भरली घागर, (लक्ष्मीबाई टिळक) समालोचकः य. गो. जोशी. प्रसाद. मार्च ५२.

चटके आणि गहिंवर (वि. ह. आपटे.) समालोः मा. नी. गलगलीकर.
युगवाणी फेब्रु ५२.

शेला, (इंदिरा संत) समालो. पां. ब. गाडगीळ.

केशवसुत आणि बी. ले. इंदुमती मोटे. युगवाणी. डिसें. ५१. ,, ,,

आधुनिक काव्य (चर्चा) ले. भ. श्री. पंडित व शरचंद्र मुक्तिबोध. युगवाणी. डिसें. ५१

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वाग्वैजयंतीचें पुनर्मूल्यन ले. डॉ. मा. गो. देशमुख. युगवाणी फेब्रु. ५२.
विरहतरंगाची नायिका, ले. रमेश तेंडुलकर. साहित्य, जाने. ५२.
नवकाव्यः मर्ढेकर आणि स्पेंडर ले. पु. शि. रेगे. साहित्य. जाने. ५२.
चंद्रलेखा [गिरीश] समालो. द. न. गोखले. सह्याद्रि. जून. ५२.
आजच्या भयाकुलतेची बेडेकरकृत मीमांसा ले. गं. ब. ग्रामोपाध्ये. रचना, मे ५२
इंदिरा संतांची कविता, ले. वा. ल. कुळकर्णी. सत्यकथा. जून. ५२
माधव जूलियन संबंधी कांही आठवणी ले. काव्याविहारी सुषमा, जाने. ५२
कवि बी. आणि बकुल, ले. ना. ना. हूड. सुषमा, जाने. ५२.

कथा कादंबरी

आजची कादंबरी, ले. वि. बा. आंबेकर. म. सा. पत्रिका. जाने–मार्च ५२.
आजची मराठी लघुकथा, ले. म. ना. अदवंत. म. सा. पत्रिका. जाने–मार्च ५२.
भावीण, (बोरकर). समालोचकः रा. श्री. जोग, मनोहर, फेब्रु. ५२.
एल्गार व हद्दपार, (पेंडसे) समालोचकः ग. न. गोखले.
कौसल्येची माडखोलकरांस सुनावणी, ले. गोपूमामा. हंस. मार्च ५२.
साहस कथा, ले. बा. गं. सामंत. सह्याद्रि. जाने. ५२.
तुळशीच्या कथा, ले. दुर्गा भागवत. सत्यकथा. एप्रिल ५२.

नाटक रंगभूमि

नाट्य साहित्य, ले. के. ना. काळे. म. सा. पत्रिका. जाने–मार्च ५२.
भारती, (नाना जोग) समालोचकः इंदुमती शेवडे, मनोहर, मे ५२.
अंमलदार, (पु. ल. देशपांडे) समालोचकः इंदुमती शेवडे, मनोहर, मे ५२.
कांही सज्जन खलपुरुष, वृंदावन, विश्राम, ऑथेल्लो
ले. निर्मलकुमार फडकुले, वाङ्मयशोभा, मार्च ५२.
गुजराथीचा नाट्यसंसार, ले. प्रभाकर तेलंग. सह्याद्रि. मार्च. ५२.
सत्तेचे गुलाम आणि मामा वरेरकर, ले. द. रा. गोमकाळे. सुषमा. जून. ५२.

चरित्र–इतिहास

चरित्र, (आजचें चरित्र वाङ्मय) ले. अ. म. जोशी. म. सा. पत्रिका, जाने-मार्च ५२.
जांभेकरीय संशोधन, ले. कृ. भि. कुळकर्णी. सह्याद्रि. जाने. ५२.

साहित्यशास्त्र व टीका

श्री. अरविंद आणि साहित्यशास्त्र,
ले. प्रा. वि. कृ. गोकाक. अनु. प्रा. ग. प्र. प्रधान. नवभारत, जाने. १९५२.
ट्रॅजेडी संबंधी एक वेगळा विचार,
ले. प्रा. वसंत कानेटकर व प्रा. राजा पाटणकर. नवभारत. फेब्रु. ५२.
मानवी अंतरात्म्याची पूर्णत्वाविषयी ओढ,
ले. कु. चं. श्री. कर्नाटकी. नवभारत. फेब्रु. ५२.
साहित्यसमीक्षा आणि रसव्यवस्था, ले. प्रा. रा. भि. जोशी. नवभारत, एप्रिल. ५२.
टीकाः काल, आज आणि उद्या, ले. वा. ल. कुळकर्णी. म. सा. पत्रिका. जाने.
मार्च ५२.
नवे अलंकार, ले. डॉ. के. ना. वाटवे. ,, ,,
साहित्य आणि सामान्य वाचक, ले. रा. भि. जोशी. रचना. जाने. ५२.
कला आणि स्वातंत्र्य, ले. दि. के. बेडेकर; वा. ल. कुळकर्णी; श्री. के. क्षीरसागर
रचना, मे, ५२.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

१९५२
ऑगस्ट

रसाचें स्वरूप, ले. प्रा. मु. शि. वालिंबे. नवभारत, मे ५२.
करुण नाट्यानें आनंद कां व्हावा! ले. य. र. आगाशे. नवभारत, जून ५२.
रसमताचें मूल्यमापन, ले. डॉ. के. ना. वाटवे. नवभारत, जून ५२.
ललित वाङ्मयकृतीचा घाट, बा. सी. मर्ढेकर. सत्यकथा, फेब्रु.५२.
कलेची फलश्रुति, ले. बा. सी. मर्ढेकर, सत्यकथा, मार्च ५२.
आधी शब्द मग अर्थ, ले. पु. शि. रेगे. सत्यकथा मे ५२.
करुणरस व आनंद ले. नी. र. वऱ्हाडपांडे. सुषमा, मार्च ५२.

छंदशास्त्र

लय आणि ऱ्हिद्म, ले. श्री गो वि. खाजगीवाले. नवभारत, मार्च ५२.
लयतत्त्वाविषयी आणखी थोडें स्पष्टीकरण,ले. ना. ग. जोशी, नवभारत मार्च ५२.
मराठी छंदोरचनेतील उत्क्रांति, ले. ना. ग. जोशी. म. सा. पत्रिका. जाने. मार्च ५२.
वृत्तदर्पणांतील-लक्षण श्लोकासंबंधी सूचना,
ले. वि. ज. सहस्रबुद्धे. सत्यकथा, मार्च ५२.
छंदाचें लक्षण, (एक चर्चा) ले. वि. ज. सहस्रबुद्धे व वा. ना. देशपांडे „ „
वृत्तलक्षणेंहि मात्रागणांनीच सांगावींत, ले. वि ज. सहस्रबुद्धे. सत्यकथा, जून ५२.

लिपी, भाषा-भाषाशास्त्र, व्याकरण

भाषाशास्त्रीय अभ्यास, ले. शं. गो. तुळपुळे, म. सा. पत्रिका. जाने. मार्च ५२.
व्याकरण, ले. म. अ. करंदीकर, म सा. पत्रिका, जाने. मार्च ५२.
लिपि, ले. शं. रा. दाते, म. सा. पत्रिका, जाने. मार्च ५२.
मराठी भौतिक शास्त्रीय परिभाषा,
ले. म. वि. आपटे, म. सा. पत्रिका, जाने. मार्च ५२.
आपली मराठी लिपी कशी आली ? ले. चिं. ग. कर्वे, प्रसाद, मार्च ५२.
भाषेचा कोशरूप सांगाडा, ले. म. वि. आपटे, सह्याद्रि, जाने. ५२.
मध्यभारतांतील मराठीचें भवितव्य, ले. अ. का. प्रियोळकर, नवभारत, जून ५२
प्रादेशिक भाषा आणि संघराज्याची भाषा, ले. द. वा. पोतदार, नवभारत, जून५२
राष्ट्रभाषा प्रश्नाची यथार्थ मीमांसा, ले. द. वा. पोतदार, नवभारत, एप्रिल ५२.

इतर

मराठी लोकांची संस्कृति, (इरावती केतकर) समालो. के. ना. वाटवे.
विवेक आणि साधना, (श्रीकेदारनाथ) समालो. ह. कृ. मोहनी नवभारत, मे ५२.
आधुनिक मानसशास्त्र, (प्रा. दे. द. वाडेकर) समालो. वा. कृ. कोठूरकर
सह्याद्रि, जाने. ५२, समालो. ल. व. हरोलीकर, नवभारत मे ५२.
लोक साहित्य आणि मराठी वाङ्मय, ले वि. भि. कोलते. सुषमा, मे ५२.

व्यक्तिपरिचय

प्रसिद्ध उर्दू कथालेखक कृष्णचंद्र, ले प्रा रा. भि. जोशी. मनोहर ५२.
सत्यवादीकार पाटील, ले. सर्जेराव पाटील. मनोहर, मार्च ५२.
पं. महादेव शास्त्री जोशी, ले. वा. भ. बोरकर, मनोहर एप्रिल ५२
केशवराव दाते, ले. ग. कृ. दाते, मनोहर एप्रिल ५२.
ब्रह्मर्षि विनोबा, ले. मा. भा. फडके, मधुवन जाने० ५२.
शांताराम आठवले, ले मो. ग. साठे, मनोहर मे ५२.
कुसुमावती देशपांडे, ले. मा. गो. देशमुख, युगवाणी एप्रिल ५२.
भारतेंदु बाबू हरिश्चंद्र, ले. ग. ना. मोघे, साहित्य जाने० ५२.
 मराठी रंगभूमीचा चिंतामणि, ले. भा. वि. वरेरकर, सत्यकथा एप्रिल ५२.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघवार्ता

श्री. ना. रा. शेंडे,
चिटणीस वि. सा. संघ
यां ज क डू न

वि. सा. संघाच्या कार्यकारी मंडळाची सभा रविवार दि. ६-७-५२ रोजीं दुपारीं ३॥ वा. अध्यक्ष डॉ. शं. दा. पेंडसे यांचे अध्यक्षतेखालीं संघाच्या कार्यालयांत भरली.

दि. १३-४-५२; दि. ३-५-५२ व दि. ४-५-५२ रोजीं भरलेल्या का. का. सभांचे अहवाल वाचून दाखविण्यांत आले व ते मंजूर झाले.

मागील वर्षाच्या सर्व समित्या व त्यांवरील सभासद तसेच कायम ठेवण्याचें ठरलें. मात्र, 'साहित्य सहकार समिती'त श्री. पु. त्र्यं. दारव्हेकर यांना समाविष्ट करण्यांत येऊन, 'कार्यक्रम समिती'चे आमंत्रक म्हणून नानासाहेब जोग यांना नियुक्त करण्यांत आले. त्याचप्रमाणे खालील 'सांस्कृतिक कार्यक्रम समिती' नियुक्त करण्यांत आली.

सांस्कृतिक कार्यक्रम समिती : आमंत्रक – डॉ० वि. भि. कोलते
सभासद – प्रा० वा. कृ. चोरघडे व
डॉ० मा. गो. देशमुख.

नाटकावरील कर माफ केल्याबद्दल सरकारचें अभिनंदन करणारा ठराव पाठविण्यांत यावा, असें ठरलें.

श्री. ना. ग. डबीर यांचेकडून गोंदिया वि. सा. संघ शाखेतर्फे 'सीमारेषेवरील मराठी–हिंदी'संबंधी आलेला ठराव विचारांत घेण्यांत येऊन तो श्री० ए. श्री. पटवर्धन यांचेकडे आणि श्री० के. ए. ताम्हणे व प्रा० ना. बा. शास्त्री यांचीं पत्रें कार्यवाहीसाठी 'परिभाषा समिती'कडे पाठविण्याचें ठरलें.

नवीन संघलेखक श्री. स. ल. साखळे यांच्या नियुक्तीला मान्यता देण्यांत आली.

वि. सा. संघाच्या शिष्टमंडळानें ना० बियाणी यांची घेतलेली भेट

वि. सा. संघाच्या शिष्टमंडळाने दि. १-८-५२ रोजीं मध्यप्रदेशाचे अर्थमंत्री ना. ब्रिजलालजी बियाणी यांची भेट घेतली. शिष्टमंडळांत वि. सा. संघाचे अध्यक्ष डॉ० शं. दा. पेंडसे, प्रा० सौ० कुसुमावतीबाई देशपांडे, प्रा. श्री. ना. बनहट्टी, डॉ. वि. भि. कोलते, श्री. बाळासाहेब ढवळे व प्रा. वा. कृ. चोरघडे हे होते. नाट्यप्रयोगांवरील कर काढून टाकल्याबद्दल शिष्टमंडळाने अर्थमंत्र्यांचे आभार मानले आणि वाङ्मयीन पुस्तकांवरील विक्रीकर काढून टाकावा, अशी त्यांना विनंती केली. अर्थमंत्र्यांनी या प्रश्नांची साधक बाधक चर्चा केली व वि. सा. संघाच्या विनंतीचा सहानुभूतिपूर्वक विचार करण्याचें आश्वासन दिलें.

सर चिंतामणराव देशमुख यांची वि. सा. संघाला भेट

भारताचे अर्थमंत्री व वि. सा. संघाचे आजीव सभासद सर चिंतामणराव देशमुख यांनी शनिवार ता ९-८-५२ रोजीं सायंकाळीं ६॥ वा. विदर्भ साहित्य संघाला भेट दिली. त्या प्रसंगीं संघाध्यक्ष प्रि. डॉ. शं. दा. पेंडसे यांच्या अध्यक्षतेखालीं त्यांचा

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

सत्कार करण्यांत आला. प्रथम डॉ. पेंडसे यांनी मार्मिक शब्दांत ना. देशमुखांचा परिचय करून दिल्यावर, वि. सा. संघाचे उपाध्यक्ष श्री. पु. य. देशपांडे यांनी वि. सा. संघाच्या कार्याची माहिती दिली. त्यानंतर ना. देशमुख यांचें आजचें साहित्य कसें असावें यासंबंधी विचारप्रवण भाषण झालें.

विदर्भ साहित्य संघाच्या परिभाषा समितीचा ठराव

(कार्यकारी मंडळानें मान्य केलेला)

मध्यप्रदेशांतील दुय्यम शाळांच्या उपयोगासाठी, तसेंच दुय्यम शाळांसाठी लिहिलेल्या सर्व पाठ्यपुस्तकांतून वापरण्यासाठी डॉ० रघुवीर यांनी तयार केलेली शास्त्रीय परिभाषा मंजूर करावी या हेतूनें मध्यप्रदेशाच्या दुय्यम शाळा बोर्डाकडे कारवाई सुरू आहे असें कळतें.

या संबंधांत सरकारला आणि दुय्यम शाळा बोर्डाच्या अधिकाऱ्यांना विदर्भ साहित्य संघ असें आग्रहपूर्वक निवेदन करूं इच्छितो की सर्वसाधारण जनता आणि शिक्षणसंस्था व साहित्य संस्था यांचा सल्ला घेतल्यावाचून ही बाब तडीस लावण्यांत येऊं नये.

विदर्भ साहित्य संघाचें असें निश्चित मत आहे की, मराठी (आणि हिंदी) परिभाषेचा प्रश्न प्रातिनिधिक पद्धतीनें धसास लावावा व कोणत्याहि एकट्या व्यक्तीनें,–मग ती व्यक्ती कितीहि विद्वान् असो,–तयार केलेली परिभाषा शिक्षणाच्या क्षेत्रांत 'हम करे सो कायदा' या पद्धतीनें लावूं नये. विदर्भ साहित्य संघ खात्रीलायक-पणानें सांगूं शकतो कीं मॅट्रिकच्या दर्जापर्यंतची बहुतेक सर्व ठिकाणी वापरण्याजोगी, उपयुक्त व यथोचित म्हणून सिद्ध झालेली अशी एक शास्त्रीय परिभाषा मराठी भाषेंत कित्येक पिढ्यांपासून रूढ झालेली आहे. अशा प्रचलित परिभाषेंत कांही भर टाकणें वा बदल करणें असेल तर तें काम अनुभविक शिक्षक, भाषाशास्त्रज्ञ आणि साहित्यिक यांच्या प्रातिनिधिक समितीनेच करावें; मराठी भाषेच्या प्रकृतीशीं ज्याचा परिचय नाही अशा कोणत्याहि व्यक्तीनें नव्हे!

मराठी भाषेपुरतें विदर्भ साहित्य संघ आणखी असेंहि दर्शवूं इच्छितो की, मराठी ही मुंबई व हैद्राबाद ह्या आणखी दोन प्रदेशांचीहि एक प्रमुख राज्यभाषा आहे आणि परिभाषेचा प्रश्न हा केवळ मध्यप्रदेशाच्याच शिक्षण खात्यानें आपल्यापुरताच एकतर्फी निकालांत काढूं नये. हीच गोष्ट हिंदी भाषेलाहि जशीच्या तशीच लागू पडते.

शास्त्रीय आणि शिल्पीय परिभाषेचा प्रश्न भारत सरकारच्या शिक्षण-मंत्रि-मंडळानें हातीं घेतला आहे. दुय्यम शाळा बोर्डाकडून डॉ. रघुवीरांची परिभाषा मंजूर करून घेण्याची कारवाई व चालू असलेली खटपट भारत सरकारच्या जाहीर झालेल्या धोरणाशीं विरुद्ध जाण्याचा संभव असल्यामुळे या महत्वाच्या प्रश्नाबाबत राज्य-सरकारनें आपलें धोरण भारत सरकारच्या धोरणाशीं मिळतें-जुळतें राहील अशा बेतानें आखावें. डॉ. रघुवीरांच्या परिभाषेला इंटर युनिवर्सिटी बोर्डानें व इंडियन् सायन्स कॉंग्रेसनें अथवा अशा कोणत्याहि अन्य क्षमताशाली संस्थेनें मान्यता दिलेली नाही. म्हणून, दुय्यम शिक्षणाच्या क्षेत्रांत तिचा प्रवेश करविणें म्हणजे आधीच्या गोंधळांत आणखी भर घालणें होय.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

“युगवाणी” (Yugawani) Regd. No. N 945

मध्यप्रदेश शाळाखात्यांकडून लायब्ररयांसाठी मंजुरी मिळालेलें

विदर्भ साहित्यसंघाचें मुखपत्र

युगवाणी

मासिक, आगष्ट १९५२

वार्षिक वर्गणी पांच रुपये :: सभासदांना विनामूल्य :: सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

विदर्भ साहित्य संघाच्या आजच्या गरजा

१. विदर्भ साहित्य मंदिराच्या इमारतीची सांगता करणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र **युगवाणी** आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं. च्या वतीने उत्कृष्ट, दुर्मिळ आणि शैक्षणिक ग्रंथांच्या प्रकाशनाचें कार्य जोमाने सुरू करणें.

५. वि. सा. संघाला मराठी भाषेच्या हिताचें कार्य प्रातिनिधिक स्वरूपाने अधिक धडाडीने करतां येण्यासाठी संघाचे सभासद वाढविणें.

या सर्वांसाठी संघाचे सभासद आणि कार्यकारी मंडळ अविश्रांत मेहनत करीत आहेत. मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने मदत करण्यास प्रवृत्त व्हावें म्हणून संघाचें कार्य नेटाने चालविण्याच्या संकल्पांत मराठीच्या नागरिकांनी हातभार लावावा अशी नम्र विनंति आहे.

विदर्भ साहित्य संघाची मराठी साहित्याच्या सेवेसाठी शक्ति वाढवा आणि जास्तींत जास्त संख्येने वि. सा. संघाला सभासद मिळवून द्या.

मुद्रक : प. वि. चेलवलकर, व्यवस्थापक, हरिहरेश्वर प्रेस, महाल, नागपूर.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

विदर्भ साहित्य संघ